विषय : नाटक

दा.क. 20282

20282

IRBK-0120242

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा फी भरावी लागेल.

MAR 1984

4 AUG

( क्र. मा. प. )
५०००-१२-८२

वाचनालय
नाटक
20242
८।३।८४

# बोल बोल म्हणता

रमेश मंत्री

IRBK-0120242

IRBK-0120242

इंद्रायणी साहित्य
पुणें

प्रकाशक
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य
२७३, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०.

मुद्रक
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

© रमेश मंत्री

प्रथमावृत्ती
२६ जानेवारी १९८४

मूल्य पंधरा रुपये

# रमेश मंत्री यांचे साहित्य

## विनोद

१) साखरेची चित्रे २) वाटाण्याच्या अक्षता ३) खसखशीचा मळा ४) कोल्हापुरी चिवडा ५) साखरपेरणी ६) एक हाती टाळी ७) बायकोचा राग ८) स्ह्याद्रीची चोरी ९) दहीहंडी १०) जनू बांडे ११) रुखवत १२) कागदी वाघ १३) चोरवाटा १४) विनोदाचा अमरकोश १५) ताजा कलम १६) कोल्ह्याची द्राक्षे १७) हास्यधारा १८) थट्टा मस्करी १९) सूर्याची पिले २०) पळसाला पाने पाच २१) स्वल्पविराम २२) हलके फुलके २३) आपलेच दात आणि दुसऱ्याचे ओठ २४) निवडक मंत्री २५) हसवाहसवी २६) विनोदी महाराष्ट्र २७) वाघाचा पुलाव २८) जॅकपॉट २९) हास्यपूर्णा ३०) हजार हास्यक्रिया ३१) बायकोवर दात ३२) साप्ताहिकी ३३) हास्यरुचिरा ३४) हेमामालिनीचा हंगामा ३५) मावशी हरवली ३६) तिरकस तिरंदाजी ३७) एलिझाबेथ ट्रेलर आणि मी ३८) गंमत काय झाली.

## नाटक आणि नाटिका

३९) वरातीमागून घोडं ४०) करीन ती पश्चिम ४१) नवऱ्याला हवी मत्रीण ४२) हनिमून झालाच पाहिजे ४३) शहाणीला भेटला दीड शहाणा ४४) चंदेरी ४५) शेजाऱ्यावर प्रेम करा ४६) चटकचांदणी ४७) हासविता धनी ४८) पुरुषांना आवडतात बायका ४९) मृगजळ ५०) लक्षाधीश ५१) ज्ञानाचे इंजेक्शन ५२) विदूषक कॉलेज ५३) लांबनाक्यांचा देश ५४) बोल बोल म्हणता

## कादंबरी

५५) तुमच्या पायी ठेविले मन ५६) महानगर ५७) अक्षर ५८) उत्तर-काल ५९) बारा लाखांत जगाची सफर ६०) स्वप्नसुंदरी ६१) मुंबई ते बांडुंग

## प्रवासवर्णन :

६२) थंडीचे दिवस ६३) नवरंग ६४) क्षणाचा प्रवासी ६५) सुखाचे दिवस ६६) ओ कलकत्ता ६७) सुखाच्या रात्री ६८) सागरकन्या ६९) बहारीचे दिवस ७०) सूर्यपुत्रांचा देश ७१) तरंगणारे जग ७२) दिशांतर

## ललित गद्य

७३) विझणारी आग ७४) अद्भुत जग

**कथा** : ७५) अखेरची शिकार

**प्रबंध** : ७६) वृत्तपत्रव्यवसाय

**बालवाङ्मय** : ७७) संजीवचा वाढदिवस ७८) मुलांची जागतिक राजधानी ७९) एक रुपयात हत्ती ८०) वाघाची फजिती ८१) हत्तीकाका घरी आले

# बोल बोल म्हणता

## रमेश मंत्री

* * * *

'बोल बोल म्हणता' या नाटकाचा पहिला प्रयोग रविवार ता. १२ सप्टेंबर १९८२ रोजी रवींद्र नाटयमंदिर, मुंबई येथे झाला. त्यातील कलाकार :

| | | |
|---|---|---|
| बाबासाहेब टोणगे | – | राम नगरकर |
| बायजाबाई | – | सौ. मनोरमा वागळे |
| गुडुराव | – | अजय वढावकर |
| बेबी | – | सौ. अपर्णा रामदास |
| सुधीर पटवर्धन | – | रामदास पाध्ये |
| सदा विचारे | – | विजय पाटकर |

* * * * * *

| | | |
|---|---|---|
| दिग्दर्शक | – | दिलीप कोल्हटकर |
| नेपथ्य | – | रघुवीर तळाशीलकर |
| संगीत | – | सुराज साठे |
| रंगभूषा | – | सुरेश ओटवणेकर |
| ध्वनिसंकलन | – | प्रदीप देशपांडे |
| प्रकाश योजना | – | विसू कामेरकर, वालावलकर |
| नेपथ्य साहाय्य | – | प्रदीप रांजणकर |

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
दा. क्र २०२४२ नों दि ८।३।८४...
वि. नाटक ... क्र. ..................

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

( *स्थळ* : बाबासाहेबांचं घर. एका टेबलासमोर ते उभे आहेत. हातात कागद घेऊन भाषणाची तालीम करीत आहेत. टेबला-समोर एका काठीला बांधलेला सिगरेटचा डबा आहे. तो मायक्रोफोनचे प्रतीक आहे. टेबलावर फोन आहे. )

बाबासाहेब : ( मोठ्या आवाजात ) बंधूंनो आणि भगिनींनो–

बायजाबाई : ( आतून लगबगीनं येऊन ) आले आले. काय हो ?

बाबासाहेब : आता तू कशाला आलीस मधीच ? तुला भगिनी म्हणण्याइतकं वय झालं का माझं एवढ्यात ?

बायजाबाई : तुमी तरुण आहात की तुमचं वय झालं ते ठाव हाये मला. मी आले म्हणजे तुम्ही असे एकदम इंचू चावल्यासारखं वराडलात म्हणून आले. म्हटलं काय झालं एकदम ह्यांचं असं !

बाबासाहेब : अगं, आजच्या सभेचं भाषण पाठ करतोय,

बायजाबाई : हां. मग बरोबर. एकटंच बसा वरडत. मी म्हणते, अहो मोकळ्या खुर्च्यांपुढं भाषणं ठोकताय त्यापेक्षा देवाचं नाव तरी घ्या. तेवढंच पुण्य लागंल.

बाबासाहेब : आणि राजकारण कोण करणार ? गरिबांचं अश्रू कोण पुसणार ? दुर्बल घटकाला मदत कोण करणार ? एवढं मोठं राजकारण सोडलं तर आपल्या बेबीला चांगला नवरा कोण देणार ?
( पुन्हा भाषण वाचतात ) बेबींनो आणि बाबांनो–

बायजाबाई : गपा. पुन्हा चालू झालं का तुमचं वराडणं ? अहो बेबीच्या लग्नात मंगलाष्टकं म्हणायची का नुसतं बंधूंनो आणि भगिनींनो म्हणून कोकलत सुटणार ?

बाबासाहेब : ( भाषण वाचतात ) आपला देश १५ ऑगस्ट १९– मायला सन

नीट वळखत नाही. जाऊ दे. कधीतरी पंधरा ऑगस्टला स्वतंत्र झाला.

बायजाबाई : एवढी गुणाची पोर, तिला चांगला शिकला सवरलेला डॉक्टर, इंजिनियर श्रीमंत पोरगा आणायचा की न्हाई ? तुम्ही बघितलाय त्यो माकडतोंड्या गुंड्या खमेलहडी ! आता येऊ दे तर. मेल्याची हड्डीच नरम करते.

बाबासाहेब : तेव्हापासून हड्डी नरम करायची... प्रथा पडली.
( बायजाबाईंना ) हे बघ. तू अशी मधी मधी बोलू नकोस. या भाषणात तुझं बोलणं येतंय बघ. एका वेळी एक काम करावं.

बायजाबाई : ( हातातला भाषणाचा कागद काढून घेऊन ) मी तेच म्हणते ना. पोरीच्या लग्नाचं आधी बघा. पिसाळलेल्या कुत्र्यागत नुसतं कोकाटत हिंडू नका.

बाबासाहेब . अगं एवढी निवडणूक होऊ दे. मग बघू लग्नाचं. बेबीचं लग्न कसं थाटात करतो.

बायजाबाई : ए...हैं...हैं... आता किती वर्सं मी हेच ऐकायचं ? निवडणूक झाली की तुम्ही पडता. मग दिल्लीला जाता. परत येता आणि पुन्हा उभे न्हाता. मग पुन्हा पडता. बेबीचं लग्न म्हणजे काम सीमा प्रश्न हाय? चाललाय आपला वर्सानुवर्सं. पडलाय घोळात.

बाबासाहेब · अगं पण...( फोनचा घंटा वाजते. फोन उचलून ) हां. हां. दिल्लीचा ट्रंककॉल ? द्या. द्या. (बायजाबाईला) आता गप बस ! खासदार यलकोटप्पा खमेलहड्डींचा फोन आहे. (फोनवर) हां. हां. येन्न समाचारं ? अहो पण पक्षातर्फे आम्हाला एक जीप आणि एक लाख रुपये मदत मिळवून द्या. त्याशिवाय गरिबांची सेवा कशी करणार आम्ही? आणि ते आमचं परमिटचं काम लवकर करा... दारू परमिट नाही हो. इंपोर्ट परमिट. हां. फाईल दिलीय तुमच्या सेक्रेटरीकडं. आणि आमच्या साखर कारखान्याला लिकर प्रॉडक्शनचं लायसेन्स कधी देता ? अहो काय खमेलहड्डी साहेब, आजकाल दारूचा कारखाना असल्याशिवाय देशाची सेवा करता येत न्हाई. हां. असं... गुंडुराव ना ? एकदम चाललंय की त्यांचं. मुंबईला या गरिबांची चटणी-भाकर आणि जॉनी वॉकर घ्यायला. रामराम (फोन ठेवतात)

बायजाबाई : त्या गुंड्याच्या बापाचं फोन व्हय ?

बाबासाहेब : अगं माझ्या भाषणाचा कागद कुठं हाय ? ( इकडे तिकडे शोधतात. बायजाबाई त्या कागदावर बसलेल्या असतात ते लक्षात येते. ) अगं उठ पंधरा ऑगस्टवर बसलीस ? (बायजाबाई उठतात. ते भाषणाचा

कागद हातात घेऊन भाषण पुढे चालू करतात) पंधरा ऑगस्ट. १५ ऑगस्टला काय झालं मला नाही माहिती, तर तुला काय माहिती ! १५ ऑगस्टला देश...हां. हे झालं. तर बंधूंनो आणि भगिनींनो, तुमचे डोळे पुसायची संधी मला द्यायला पाहिजे. तुमचे सर्व प्रश्न सोडवण्याचं मी आश्वासन देतो. तुम्हाला घरं मिळतील. तुम्हाला कपडालत्ता, धान्य मिळेल. तुम्हाला कामगारांना जास्त महागाई मिळेल. नाही, जास्त महागाईभत्ता मिळेल. म्हाताऱ्या-कोताऱ्यांना फुकट औषध, बेकारांना रोज पंचवीस रुपये भत्ता. उपवर मुलींना नवरे मिळवून देण्याचेही मी आश्वासन देतो. मला निवडून दिलंत, तर सरकारमध्ये एक विवाहमंत्री घेऊ. ज्यांची लग्नं जमत नाहीत, त्यांची लग्नं करून द्यायची पंचवार्षिक योजना आम्ही आखू. ज्यांना मुलं होत नाहीत, त्यांना त्या कामात मदत करू.

बायजाबाउ . अहो, काय शुद्धीवर हायसा काय ? कशाची नि कुणाला मदत करताय ? ( आतून गुंडुरावांची 'काका' अशी हाक येते. ) आला तुमचा जावाई, असल्या खुळ्याच्या गळ्यात सोन्यासारखी पोरगी...

गुंडूराव : (प्रवेश करून) काका ऽ ऽ काका ऽ ऽ !...

बायजाबाई : (गुंडुरावांच्या अंगावर धावून जात) ए गपे, का... का आलासा इथं तुम्ही गुंडुराव ?

गुंडुराव · (बाबासाहेबांच्या मागे लपून) काका, ही काकी एकदम भडकतंय की हो ! भीती म्हणजे एकदम फार वाटती हो !

बायजाबाई : आता हे नाचकाम बंद करा, न्हाईतर डोचक्यावर पाण्याची बारडी वतीन बघा.

बाबासाहेब · अगं अशी ओरडतेस कशाला ? माझे सेक्रेटरी आहेत खासदारसाहेब. ते महत्त्वाच्या कामासाठी आले असणार. हं. काय म्हणताय गुंडुराव?

गुंडुराव · काका, ते मानसं येत न्हाई हो मीटिंगला– पाच रुपयावर त्ये आपोझिशनचं सात रुपय देतंय् की हो शिदळीचं एका मीटिंगला,

बाबासाहेब : (आश्चर्यानं) नुसतं मीटिंगला येऊन भाषण ऐकायला माणशी सात रुपये ? आम्ही लहान होतो तेव्हा महिन्याची खानावळ व्हायची सात रुपयांत !

गुंडुराव : आता बगा म्हंजे झालं–अन् म्हणत्यात वर टाळ्या वाजवायचं येगळं. पन्नास पैसं, एका टाळीला.

बाबासाहेब : अरं तिच्या मायला ! मग आता काय करायचं ?

बायजाबाई (रागानं) बसा आता तुम्ही दोघंच टाळ्या वाजवीत,

गुंडुराव : मग द्या आठं आणं.

बायजाबाई : चल मेल्या.

बाबासाहेब : काय करणार खासदार ? देऊन टाका पैसे. अहो, गरिबी आपणच हटवली पाहिजे. आपण मतदारांना पैसे दिले न्हाईत तर त्यांची गरिबी कशी हटणार ? असं करा, सभेच्या सुरुवातीला माणसं जमावीत म्हणून नुसती पन्नास माणसं घ्या भाड्यानं.

बाबासाहेब : आमच्या बेबीची मदत घ्या. अहो एवढी शिकवली ती काय उगाच ! काय फस्क्लास आयडीया दिली तिनं त्या बाहुलीवाल्याची.

गुडुराव : भावलीवाल्याचं कसलं आयडीया हो ? आम्हाला पण द्या की सांगून.

बाबासाहेब : ती म्हंते सभेला गर्दी करायची म्हंजे नुसतं भाषण करून होनार न्हाई. नुसत्या रेकार्डी लावूनसुद्धा चालणार न्हाई. त्या करता समद्या लोकांना फुकटमंदी एखादा प्रोग्रॅम दाखवला पाहिजे. एक डाव गर्दी झाली की ठोक भाषन.

बायजाबाई : काय बी केलं तरी गर्दी व्हनार न्हाई.

गुंडुराव : हचे आमचं बेबी म्हंजे एक लंबर हुषार बघा ! स्मार्ट म्हटलं तर कळेल तुम्हाला.

बायजाबाई : आमचं बेबी ? (गुंडू हसतो) ठेवलंय तुझ्या काकानं.

गुंडुराव : ह्ये काकानंच ठेवलंय बेबी नाव. ह्ये काकी असं काय म्हनतंय हो ?

(बायजाबाई– चिडून उठतात)

बाबासाहेब : तुम्ही तिकडं ध्यान देऊ नका. तुम्ही आमचे सेक्रेटरी आहात ना ? तुम्ही बेबीला मदत करा.

गुंडुराव : गेलं कुठं हो ? मगाधरनं शोधतोय हिकडं तिकडं हिकडं.

बाबासाहेब : ती गेलीये बाहुलीवाल्याकडं प्रोग्रॅमचं फिक्स करायला.

गुंडुराव : काय बाहुलीचं नाच करनार हाय ? मग भाषन केव्हा करनार ?

बाबासाहेब : गर्दी झाल्यावर. एवढं कळत न्हाई काय तुम्हाला ?

गुंडुराव : हा फुकटचा नाच बघायला गर्दी जमनारच की हो. आता ते आपोझिशनवालं बोंबललंच की हो शिंदळीचं !

बायजाबाई : पर तू जरा हळू बोंबल. काय घरात हायेस का चावडीत हायेस ?

गुंडुराव : ह्ये असं काय म्हनतंय हो ?

बाबासाहेब : तुमी ध्यान देऊ नका तिकडं. त्या रामराव पुरंदऱ्याला म्हनावं बघ, आता कसा फड मारतो ते.

बायजाबाई : तुमच्या इरुद्ध रामराव उभा हाये ? मग यंदा तुमचं काही जमत न्हाई. तुम्ही नक्की पडणार !

गुंडुराव : पडायला काय झालं हो ? ते कसलं ते रामराव ? एकदम फडतूस कंडम म्हनायचं तर !

बायजाबाई : गुंडुराव, तुमच्यापरीस न्हाई त्यो. रामराव भला मानूस हाय.

गुंडुराव : भला मानूस ! मग ते राजकारनात काय करतंय हो ? भला मानूस घरात बसतंय. नाहीतर शाळेत बसतंय पोरं हाकत. हे राजकारन करायचं म्हणजे ताकदीचं पाहिजे हो. या बाबासाहेबांसारखं. आता ह्येंच्यासमोर ते म्हणजे मच्छर म्हनायचं तर !

बाबासाहेब : गुंडुराव, इरोधी माणसाला शिव्या देऊ नयेत. मंत्री झाल्याबिगर, निवडणूक होईस्तोवर, सगळ्यांशी गोड गोड बोललं पाहिजे.

गुंडुराव : हाई, तसा मानूस एकदम थोर हो ते !

बाबासाहेब : (खूष होऊन) शाब्बास ! तुम्ही आता नक्की खासदार होनार बघा. आता भाषणाची तालीम ऐका, बंधूंनो आणि भगिनींनो–

गुंडुराव : थांबा थांबा काका, हे माजं एक लेखक-मित्र देऊन गेलं बघा. ते काय म्हणतं, ते बंधूनोभगिधूनो जुनं झालं. भाषनची सुरुवात कशी एकदम फर्मास झाली पाहिजे बघा.

बाबासाहेब : म्हणजे कशी ?

गुंडुराव : बदमाषांनो आणि गुंडांनो–

बाबासाहेब : अहो, अहो काय हे ? बदमाषांनो आणि गुंडांनो ?

गुंडुराव : काका, ते बदमाष आणि गुंड असलं तरी त्यांना एक मत असतं की ! अन् गुंडांचं एक बरं असतं– पैसं घेतलं तर बरोब्बर मत देतंय बघा! अन् ते शिकलेली बंधूभगिनी, मतदानाच्या दिवशी घरात बसतंय् की हो !

बाबासाहेब . नाही नाही, ते बंधूंनो आणि भगिनींनोच बरं आहे. दिसायला बरं दिसतं ते.

गुंडुराव : नाही हो, ते एकदा म्हणून म्हणा की हो !

बाबासाहेब : नाहीतर आपण असं करू या, बेबीला इचारू या. ही बेबी कुटं गेली ? भाषणाची येळ होत आली.

गुंडुराव : त्येच हो. त्ये घरात नसलं म्हणजे जीव नुसता तळमळ, तळमळ, तळमळतंय् बघा.

बायजाबाई : आणि तुम्हाला बघून तिला मळमळ, मळमळ, मळमळतंय् बघा.

गुंडुराव : ह्ये असं काय करतंय हो ? (रडवेला होतो.)

(बेबी प्रवेश करते)

बेबी : किती हा उशीर ? मी तिकडे सभेच्या ठिकाणी तुमची वाट पाहतीय्.
बायजाबाई : अक्षी शंभर वर्षं आयुक्ष हाय पोरीला.
गुंडुराव : हिला शंभर म्हणजे मला एकशेदहा वर्षं झाली की !
बायजाबाई : तुमी गपा ! नाहीतर (पानाचा डबा हातात घेऊन) ह्यो फेकून मारीन.
गुंडुराव : काका, ह्ये असं काय करतंय हो ?
बाबासाहेब : तुम्ही तिकडं लक्ष देऊ नका. अगं, पण तू त्या बाहुलीवाल्याकडं गेली होतीस ना ?
बेबी : अहो, त्यांची उद्याची अपॉइंटमेंट घेतली आहे. ते जाऊ दे. आता चला तुम्ही. अहो, साडेसहाची सभा आहे. लोक तिकडं वाट बघताहेत.
बाबासाहेब : पण यांनी मला साडेसातची म्हणून सांगितलं.
गुंडुराव : अहो, ते हुबळीला सहा म्हटलं की सात होतात बघा.
बेबी : ते जाऊ दे हो. चला आता लवकर कपडे बदलायला.

(फोन येतो. गुंडुराव फोन घेतो.)

गुंडुराव : कोण रे तो ? बाबासाहेब ? येताहेत. हे निघालेच बगा. आता निघतंय. कोण रे ? काय माणसंगिणसं आहेत का ? आं, पाच ? (बाबासाहेबांना) काका, पाच माणसं आहेत. (फोनवर) कोण रे ! पकडून ठेवा घट्ट, सोडू नको कुट्टं ! पाच आहेत म्हंजे गर्दीच म्हनायची बरं !

(फोन ठेवतो. बेबी सगळ्यांना हाकलत नेते)

बायजाबाई : (हात जोडून) यंदा काय जुळत न्हाय यांचं.

(पहिला प्रवेश समाप्त.)

* *

# अंक पहिला

## प्रवेश दुसरा

(सुधीरचे घर. आजूबाजूला बाहुल्या. खिडकीत बसलेली कावळीण ओरडते, " ती आली ती आली "...)

कावळीण : ती आली, ती आली, काव, काव...
सुधीर : कोण ? बेबी आली का ?
कावळीण : गाडी आली, गाडी आली.
सुधीर : कोणाची ?
कावळीण : मामाची गाडी आली.
सुधीर : कोणाची ?
कावळीण : काकाची गाडी आली. काव, काव—

(बाबासाहेब बाहेरूनच)

बाबासाहेब : कोण हाय का घरात ?
सुधीर : या, या, या.
बाबासाहेब : सुधीर पटवर्धन— बाहुल्यांचे खेळ करणारं तुम्हीच न्हवं ?
सुधीर : हो, मीच तो. पण आपलं नाव ?
बाबासाहेब : (आश्चर्याने) आत्ता काय करायचं ? मला वळिखलं न्हाई तुमी ?
सुधीर : (विचार करीत) नाही बुवा, पण नाव सांगितलंत तर ओळख पटेल.
बाबासाहेब : काय ? माझं नाव इचारता ? कमाल आहे. इंदिरा गांधींना इचाराल का तुमचं नाव काय म्हणून ?
बंड्या : आपणच का त्या ?
सुधीर : ओळखलं नाही मी आपल्याला.
बंड्या : (सुधीरकडे पाहून) फोटोत बाईसाहेब, आपण जरा वेगळ्या दिसता.

बाबासाहेब : हे भावलं बोललं का ? अवो, मी पंतप्रधान इंदिरा गांधी नाही. पण त्यांच्याएवढा फेमस आहे मी आणि तुमी माझं नाव इचारता म्हणजे इन्सल्ट आहे माझा.

सुधीर : नाही नाही, तसा माझा उद्देश नव्हता. पण आपण काय करता, कुठं असता हे तरी सांगाल की नाही ?

बाबासाहेब : ते सगळं आमची बेबी सांगंल (मोठ्याने हाका मारीत) बेबी, ए बेबी.

सुधीर : बेबी ? तुमच्याबरोबर बेबीला पण आणलंय का ? मग ती कुठाय ?

बंड्या : रांगत येत असेल.

सुधीर : काय ?

बंड्या : बेबी आहे, छोटी आहे.

सुधीर : कळलं.

बाबासाहेब : ती छोटी नाही. बी. ए. होऊन दोन वर्सं झाली तिला.

सुधीर : असं असं. मग खाली काय करते आहे तुमची ती बेऽबी ?

बाबासाहेब . ती गाडी पार्क करतीय्. आमची इंपोर्टेड गाडी आहे– कॅडिलॅक.

बंड्या : आणि बेबी ? तीसुद्धा इंपोर्टेड आहे का ?

बाबासाहेब : ती कशाला हो ? आम्ही हायंना इथं मजबूत ! बेबी एकदम मेड ईन इंडिया हाय बघा. कुठं गेली शिची ? आमची बेबी दिसायला एकदम् सुंदर आहे.

सुधीर : आईच्या वळणावर गेली असेल !

बाबासाहेब : (हाक मारतात) बेबी. बेऽबी.

(आतून बेबीचा आवाज– आले, बाबा. आले)

सुधीर : आवाज चांगला दिसतोय बेबीचा.

बाबासाहेब अहो तुम्ही येडं का खुळं ? बेबीचा आवाज फर्स्टक्लास. (बेबी येते. २३–२४ वय. सुंदर. हातात कागदपत्रं. पर्समधून रुमालाची माळ थोडीशी बाहेर लोंबत आहे.) ही बघा आलीच. (तिला उद्देशून) बेबी, ह्या साहेबास्नी मी कोन ते म्हाईत न्हाई. आमचा परिचय वाचून दाखव त्याला.

बेबी : (हातातल्या कागदपत्रातून एक पान काढून वाचू लागते) देशभक्त माजी आमदार बाबासाहेब टोणगे यांचा जन्म २९ जानेवारी १९१८ साली सातारा जिल्ह्यातील परचुंडी गावात एका शेतकरी कुटुंबात झाला. लहानपणापासूनच बाबासाहेबांना देशाच्या स्वातंत्र्याची चिंता.

ब्रिटिशांच्या लोखंडी शृंखलात खितपत पडलेला आपला प्रिय देश स्वतंत्र व्हावा म्हणून त्यांनी वयाच्या अवघ्या सहाव्या महिन्यातच रडून रडून आकांत केला. पुढे बाबासाहेब वाढत गेले, वाढत गेले–

महाराज : बरेच वाढले की हो.

बेबी : (वाचते) तशी त्यांची देशाबद्दलची चिंताही वाढत गेली. प्राथमिक शाळेत असताना बाबासाहेबांनी आपल्या मराठी पुस्तकातल्या व्हिक्टोरियाला शाईने दाढीमिशा काढून फार मोठी देशसेवा केली. तरीही ब्रिटिश जाईनात. मराठी चौथीनंतर त्यांनी ब्रिटिश आमदानीचा निषेध म्हणून शाळेवर लाथ मारली–

(बाबासाहेब उजवा पाय झाडतात.)

महाराज अजून लाथा झाडता का तुम्ही ?

बाबासाहेब नाही, वयामुळं हा उजवा गुडघा अवघडतो बघा. अधून मधून (पाय झाडून) झाडावा लागतो.

बेबी (वाचते) लाथ मारली आणि देशसेवेला स्वतःला वाहून घेतले.

सुधीर कळलं कळलं. आता पुढचं वाचलं नाही तरी चालेल. म्हणजे थोर देशभक्त बाबासाहेब टोणगे ते आपणच.

बाबासाहेब ते माजी आमदार राह्यलं.

सुधीर : हो–हो. माजी आमदार. बरं, मी आपली काय सेवा करू ?

बाबासाहेब छे: छे: सेवा आम्ही करायची. आपण जनताजर्नादन. आपणच आमचे देव.

बंड्या : निवडणूक जवळ आलेली दिसते.

बेबी बरोबर. आमचे बाबा या वर्षी उभे राहणार आहेत. तसे ते दर वेळेलाच उभे राहतात.

सुधीर : कुठल्या पक्षातर्फे ?

बाबासाहेब ते अजून ठरायचं आहे साहेब. ज्या पक्षाला बहुमत मिळेल, त्या पक्षात आम्ही ! अहो बहुमतवाल्या पक्षात गेलं तर उपमंत्री, राज्यमंत्री, मंत्री असं व्हायचा चान्स असतो.

सुधीर : बरोबर आहे. पण बाबासाहेब, यापूर्वी आपण कधी मंत्री उपमंत्री झाला होता का ?

बाबासाहेब : थोडक्यात चान्स चुकला बघा. जनता पक्षाचं केंद्र सरकार होतं,

तेव्हा मी जनता पक्षात गेलो. पक्षातल्या दादा लोकान्ला म्हटलं, मला निदान राज्यमंत्री, उपमंत्री करा.

सुधीर : मग त्यांनी काय सांगितलं ?

बाबासाहेब : ते म्हणाले, अजून लहान आहात तुम्ही !

महाराज : तुम्ही ? लहान ?

बाबासाहेब : तर काय हो. जनता पक्षाचे नेते म्हणाले, " आमच्याकडं पंच्चाहत्तर वर्षे झाल्यावर उपमंत्री, ऐंशी झाल्यावर राज्यमंत्री आणि नव्वदी उलटल्यावर, डोळे–कान सगळं बंद झाल्यावर मग मंत्री होता येतं !

सुधीर : हे बाकी खरं आहे. स्वतःच्या पायावर उभा राहता येतो तो मंत्री कसा ? ज्याला उचलायला दोन चार लोक लागतात, तोच मंत्रीपदाला लायक.

बाबासाहेब : जनता पक्ष आणखी दहा वीस वर्षे अधिकारावर राहिला असता, तर बरं झालं असतं बघा.

सुधीर : ते कसं काय ?

बाबासाहेब : अहो, मी मेल्यावर मला राष्ट्राध्यक्ष करायचं आश्वासन दिलं होतं त्यांच्या पुढाऱ्यांनी !

(सुधीर हळूच बेबीजवळ जातो. त्याला बाबासाहेब थांबवतात.)

बाबासाहेब : तुम्ही आधी आमच्या पक्षात या. जनता पक्षाचा पराभव झाला तेव्हा मला पटलं, की हा पक्ष गरिबांचे प्रश्न सोडवत नाही. म्हणून दुर्बल घटकांना मदत करण्यासाठी मी जनता पक्ष सोडून काँग्रेस आयमध्ये आलो. नेहरू पंतप्रधान होते, तेव्हा मी नेहरू शर्ट आणि सुरवार घालत होतो. लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले, तेव्हा मी सुरवार सोडली आणि धोतर नेसायला लागलो. इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्याबरोबर मी माझ्या मापाचा ब्लाऊज आणि एक साडीसुद्धा घेतली !

सुधीर : तुमची थोर तत्त्वनिष्ठा माझ्या लक्षात आली, पण या सर्वांचा माझ्याशी काय संबंध ?

बाबासाहेब : बेबी, साह्यबास्नी आपली योजना सांग.

बेबी : त्याचं काय आहे. आता लवकरच निवडणुकांच्या प्रचार सभा सुरू होतील. तेव्हा आमची आयडिया अशी आहे, की सभेच्या सुरुवातीला तुमचे बोलक्या बाहुल्यांचे खेळ ठेवायचे.

सुधीर : असं असं. आत्ता आलं लक्षात.

बेबी : आत्तापर्यंत आम्ही सिनेमातल्या गाण्यांच्या रेकॉर्डस लावून गर्दी गोळा करीत होतो; पण आता लोक हुषार झाले आहेत हो. सिनेमाच्या गाण्यांच्या रेकॉर्डस लावल्या, की निवडणुकीची प्रचार सभा असेल म्हणून लांबच पळून जातात. म्हणून तुमचे बाहुल्यांचे खेळ ठेवण्याची ही आयडिया काढली.

(बोलता बोलता बेबी सुधीरजवळ जाते.)

बाबासाहेब : (हिला बाजूला करीत) हां. हां लांबून, लांबून.

बेबी : (वैतागानं) काय हो बाबा, सारखं लांबून, लांबून ?

बाबासाहेब : तुमच्याकडं बाहुल्यांचे काय काय खेळ आहेत याची तर आयडिया द्या.

सुधीर : हो. हो. देईन ना. या. प्रथम मी तुम्हाला माझ्या दोस्त मंडळीची ओळख करून देतो. (कुत्र्याची ओळख करून) हां. हां, मोत्या कुत्रा.

(कुत्रा ओरडतो.)

बाबासाहेब : हां, कुत्रं म्हंजे काय, हा विरोधी पक्ष हो.

सुधीर : तो कसा काय बुवा ?

बाबासाहेब : कुत्रं सारखं केकाटतंय की हो. त्येला मारलं तरी वरडतंय्, न्हाई मारलं तरी वरडतंय. अगदी इरोधी पक्षागत बघा !

सुधीर : (सशाची ओळख करून देताना) आणि हे आमचे ससोबा. (ससा पाय हलवून ' नमस्ते ' म्हणतो.)

बाबासाहेब : हे म्हणजे स्वतंत्र आमदार हो. सारखं भिऊन भिऊन असतं. जरा कुठं गडबड झाली की गपकन जमनीखाली जातं बघा आणि एकटंच गाजरं खात बसतं !

सुधीर : (गाढवाची ओळख करून देत) आणि हे कोण ओळखलंच असेल आपण.

बेबी : बाबा गाढव !

बाबासाहेब : (रागानं) आँ ? मला गाढव म्हणतीस ?

बेबी : नाही हो. हे गाढव बघा, म्हटलं मी.

बाबासाहेब : (कौतुकानं) अरेच्या ! गाढवसुद्धा आहे का तुमच्याकडे !

सुधीर : नुसतं आहे असंच नाही, ते बोलतंसुद्धा.

बाबासाहेब . मी बोलू का त्याच्याबरोबर ?

सुधीर . वा: ! म्हणजे काय ? तुमचाच अधिकार आहे तो !

बाबासाहेब (गाढवाला) काय गाढवसाहेब, आता विलेक्शन आलीय. तुम्ही उभा न्हाणार का ?

गाढव . तुम्ही उभे आहात ना ? मग मी आणखी कशाला ?

बाबासाहेब : (हसून) हुषार आहे की हो हे गाढव. बघा साहेब, हे गाढव असून गाढवपणा करत नाही. नाहीतर आम्ही माणसं. माणूस असून गाढवपणा करतो की न्हाई ?

सुधीर : (एका बाहुल्याची ओळख करून देत) हा बंड्या. गाढवापेक्षा चांगला बोलतो.

बंड्या . कसं काय पाव्हणं बरं हाय का ?

बाबासाहेब . आँ ? हां. हां. बरं हाय.

बंड्या : काल काय ऐकलं ते खरं हाय का ?

बाबासाहेब : (घाबरून) छे. छे. तो सगळा आमच्या विरोधी उमेदवाराचा चावटपणा हो. आमचं चारित्र्य म्हंजे धुतल्या तांदळासारखं. मग आम्ही साखरेचा काळाबाजार कशाला करू हो ?

बंड्या . अरेच्या ! म्हणजे साखरेच्या काळ्याबाजाराबद्दल बोलत होता होय तुम्ही ? मी काय निराळंच ऐकले होतं.

बेबी : छे: छे: त्या सहकारी बँकेतल्या भ्रष्टाचाराचं प्रकरण ना ? अगदी खोटं ! बाबांचं नाव उगीच गोवलं होतं त्यांनी दुष्टाव्यानं.

बंड्या : हे पण नाही. आम्ही तिसरंच ऐकलं होतं !

बाबासाहेब : आता काय ऐकलं आणखी ? हां. हा. त्या तमाशातल्या बाईचं प्रकरण? अहो, त्यात काही दम नाही. ती आपणहून आली होती आमच्याकडं.

बंड्या ते पण नाही. आम्ही आणखीच काय भलतं ऐकलं होतं !

सुधीर (रागावून) बंड्या ! तू गप बस बघू. नुसत्या चौकशा कशाला हव्यात तुला ? आयतं चालून आलेलं काम घालवशील हातचं.

बंड्या पण मी कुठं लफडी उकरून काढतोय ? हे आपण होऊनच सांगताहेत. मी ऐकलं होतं खरं—

सुधीर (त्याच्या तोंडावर हात धरून) गप्प म्हणतो ना ? मूर्खा, राजकारणात कधी खरं बोलतात का ? (बाबासाहेबांना) माफ करा हं बाबासाहेब, लहान आहे तो अजून. त्याला काही कळत नाही. (बंड्याच्या तोंडावरचा हात काढतो.)

बाबासाहेब : (चिंतेच्या सुरात) पण काय ऐकलं होतं त्यानं.
बंड्या : मी काल सिनेमातलं गाणं ऐकलं होतं–

(गाणं म्हणतो.)

कसं काय पाटिल बरं हाय का ।
काल काय ऐकलं ते खरं हाय का ।।

(बेबी हसते. सुधीर आत जातो.)

बेबी : छान म्हटलं ना गाणं, बाबा ?
बाबासाहेब : तुला हसाया काय झालं ? हितं बापाची अब्रू जातीये आणि तू हसतीस ? (बंड्याला) ए, तुला असं शिकवलं का तुझ्या मालकानं बोलायला ? आता गप बसलं कार्टं. काय रे ए नरसाळ्या ? इब्लिसच दिसतंय.

(सुधीर माकड घेऊन येतो.)

माकड : नमस्कार नमस्कार. टाराटीरी. तुमचं नाव काय ?
बाबासाहेग : बाबासाहेब. तुझं नाव काय ?
माकड : राजनारायण ! टाराटीरी.
सुधीर : अरे वा: शेपटी छान आहे हं तुझी गोंडेदार. बाकी तुला चांगलं नाव मिळालं नाही काय ? काय लांब शेपटी आहे ?
माकड : शेपटी काय बघता ? कधी बघितली नाही का ? तुम्हालापण होती.
सुधीर : मला ?
माकड . मागे होती
सुधीर : मागे ? (सुधीर मागे बघतो.)
माकड : मागे म्हणजे फार फार वर्षांपूर्वी होती. तुला होती, तुम्हाला होती. (बेबीकडे बोट दाखवून) त्यांना पण होती
बेबी : शी: ! मला शेपटी ?
माकड : लाजायला काय झालं ? आता नाही ना ?
सुधीर : अरे आपले हे मोठे पाहुणे आहेत. त्यांना असं बोलू नये. त्यांना नमस्कार कर.

माकड : हॅलो, हाऊ आर यू ? शेकहॅंड करू का ?
बाबासाहेब . अरेच्चा ? विंग्रजी बोलतंय की. आणि शेकहॅंड करतंय की.
माकड : तुम्ही मला भावासारखे ना ?
सुधीर : ए, भावासारखे काय म्हणतोस ?
माकड : मग बाबांसारखे म्हणू ?
बेबी : नको. म्हणजे मी तुझी बहीण झाले की रे ?
माकड : चालेल ! तुम्हीसुद्धा माझ्यासारख्याच सुंदर आहात. गाणं म्हणू ?
सुधीर : नको.
माकड : म्हणतो.
बेबी : नको.
माकड : (सुधीरला) ए, म्हणतो की नाही रे ?
सुधीर : म्हणतोस रे.
माकड : (गाणं म्हणतो) सूनो मेरे बंधू रे...सूनो मेरेऽऽ
आज दाढी केली नाही वाटतं ?
सुधीर · केली की.
माकड : कुणाकुणाची केली?
सुधीर . ए, मी काय दाढी करतो काय ?
माकड : (बाबासाहेबांच्याकडे पाहून) तुम्ही करता ना हो ?

(सुधीर माकडाला चापट्या मारत आत नेतो.)

बाबासाहेब · आयला. हे तर मालकाची बी मस्करी करतंय !
बेबी . पण, मज्जा येते की नाही ? अशा खूप बाहुल्या आहेत यांच्याकडे.
बाबासाहेब : तुला दावलं का सगळं ?
बेबी : हो.
बाबासाहेब : मग मज्जा येणारच ! ओ सुधीरराव...
(सुधीर येतो.) वा: वा: वा: तुमच्या बोलक्या बाहुल्यांचा खेळ अगदी बेस्ट आहे हं. अहो, पण एवढा चांगला खेळ बघितल्यावर आमच्या भाषणाला थांबणार कोण ?
बेबी . आपण असं करू या. बाबा, भाषणाच्या आधी दहा मिनिटं यांचा खेळ ठेवायचा मग जाहीर करायचं की सुप्रसिद्ध देशभक्त बाबासाहेब टोणगे.
बाबासाहेब ते माजी आमदार राहचलं.

बेबी : तेच हो. माजी आमदार आणि भावी मंत्री बाबासाहेब टोणगे यांचं भाषण आता होईल. त्यानंतर पुन्हा ह्यांचे बाहुल्यांचे खेळ ठेवायचे.

बाबासाहेब : अगदी शेंट परशेंट जमल बघ बेबी.

सुधीर : पण पैशांचा व्यवहार आधी ठरला तर बरं ! कारण मग मी जास्त पैसे मागितले असं व्हायला नको.

बाबासाहेब : पैशाची काळजी सोडा हो. आता तुमची गरिबी हटवतो बघा. बेबी, आपली पोझिशन सांग साहेबास्नी.

बेबी : अहो, खंटामळे गावाला आमचा साखर कारखाना आहे. आमचे बाबा जिल्हा को–ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन आहेत.

बाबासाहेब : यावेळेला नुसता इलेक्शनचा खर्च पंचवीस लाख रुपये येणार आहे. अहो, लोकशाहीमध्ये खर्चाकडं बघून चालत नाही.

कावळीण : लोकशाही झिंदाबाद ! लोकशाही झिंदाबाद ! कावकाव.

बाबासाहेब : ह्यो कावळा आमच्या पक्षाचा दिसतोय. कावळ्यावरनं आठवण झाली; आपले गुंडुराव कुठे आहेत ?

बेबी : खरंच की. आतापर्यन्त यायला पाहिजे होते खासदारसाहेब.

सुधीर : खासदार ? म्हणजे कोण ?

बाबासाहेब : गुंडुराव खमेलहट्टी. आमचा सेक्रेटरी आहे तो. आणि पुढे (बेबीकडे हसून पाहतात) आमचा जावईसुद्धा –

बेबी : (नाराजीनं) हे हो काय बाबा ?

(सुधीर व बेबी एकमेकांकडे पाहतात.)

(आतून गुंडुरावची हाक "काका.")

कावळी : तो आला. तो आला.

(गुंडुराव 'का...का' प्रवेश करतो)

गुंडुराव : आम्हाला जास्त झाली काय ? उशीर ?

बाबासाहेब : (घड्याळाकडे पहात) किती वेळ लावला हो !

गुंडुराव : सगळं करायचं राहिलं होतं की भाषनचं– तयारी. मग ते माईकचं दिलं– ऑर्डर आणि येताना ते भेटलं की रेशनचं– दुकान. म्हणून जास्त झालं बघा– लेट.

बाबासाहेब : हेच ते सुधीर.

गुंडुराव : सुधीर?

बाबासाहेब : पटवर्धन.

गुंडुराव : हा पटवर्धन.

बाबासाहेब : आणि हे आमचे सेक्रेटरी खासदार गुंडुराव खमेलहट्टी. हे नेहमी लेट येतात.

बंड्या : सेंट्रल रेल्वेनं येत असतील.

सुधीर : पण इतक्या लहान वयात तुमी खासदार झालात म्हणजे विशेष कौतुकाची गोष्ट आहे.

गुंडुराव (हसून) हां हां बनलात बघा तुमीसुद्धा ! अशो खासदार आमचं बाप हायीत की वो. तिकडं कर्नाटकात निवडून आलेत. आणि आमचं हे काका आमालाच म्हनतंय बघा– खासदार. लई सभाव हाय त्यांचा थट्टेखोर म्हटलं तर कळंल तुम्हाला.

बाबासाहेब : आमचे परममित्र यळकोटप्पा हंचाप्पा खमेलहट्टी म्हणजे कर्नाटकातला एकदम वजनदार माणूस. पंचवीस वर्षं पार्लमेंटमध्ये निवडून येतोय.

गुंडुराव : आमचं बाप आणि ह्ये काका म्हणजे अगदी लंगोटी... लंगोटी काय त्ये ?

बाबासाहेब : लंगोटीयार.

गुंडुराव हां तेच ते. प्रेम म्हणजे बघा आगदी भावाभावासारखं सख्या ! माया अगदी रामरावणासारखी म्हणायची तर !

सुधीर रामरावणासारखी ? (बंड्या हसतो)

बेबी . राम-लक्ष्मणासारखी हो गुंडुराव, काय वाटेल ते बोलताय ?

गुंडुराव त्येच हो. राम-रावणापैकी राम तरी बरोबर आलं की नाही ? १०० पैकी ५० पडलं की हो– मार्क. शाळेत कधी ५–६ च्या पुढं गेलं नाही. हितं पन्नास मार्क पडलं तरी करतंय की ह्यो आमची टिंगल !

बाबासाहेब त्याचं काय आहे सुधीरराव, आम्हाला महाराष्ट्राच्या मिनिस्ट्रीत जायचं तर वर कुणीतरी वाली पाहिजे.

सुधीर . वर ? म्हणजे कोठे ?

बाबासाहेब : वर म्हणजे दिल्लीत हो. राजकारण. सगळं दिल्लीतून हालतं बघा ! दिल्लीच्या हुकुमाशिवाय आम्ही इकडचं पान तिकडं करीत न्हाई. आता या बेबीच्या नावाचंच घ्या.

सुधीर मी घेऊ ? नावाचं काय ?

बाबासाहेब अहो, बेबीचा जल्म होऊन दोन वर्षं झाली तरी तिचं आम्ही नाव ठेवलं नव्हतं.

सुधीर : का हो ? नावं काय कमी आहेत काय ?

बाबासाहेब : तसं नव्हे. असो, हायकमांडकडून मंजुरी आली न्हाई. आपण पक्षाची शिस्त मोडत न्हाय. तुम्हाला हायकमांडमध्ये सपोर्ट करनारा कुणी-तरी लागतो. आता ह्ये हुबळीचे खमेलहट्टी एकदम पक्षाच्या दादा लोकांपैकी. पुन्हा लक्षाधीस नाही तर कोटयाधीश मानूस.

गुंडुराव : (डायरी काढून) अहो काका. ते पोस्टर आणि जाहिरातीचं बघायला जायचं आहे. मग तिथनं निघायचं बघा आमदार निवासात. मग ५ वजता दारूबंदी कमिटीची मीटिंग. ६ वाजता दारू दुकानदारांची मीटिंग ?

बाबासाहेब : अच्छा ! दोन्ही आजच ? मग दोन्ही एकदम का घेतल्या नाहीत ? जाऊ या हो. वेळेवर पोचला तर त्याला कुणी पुढारी म्हणत न्हाईत. हे सुधीर पटवर्धन आपल्या इलेक्शनच्या मीटिंगला भावल्यांचे खेळ करणार आहेत. बेबी गाणार आहे.

गुंडुराव : बेबीचं गाणं ? अहाहा— बेबीचं गाणं म्हणजे सुब्बलक्ष्मीच्या तोंडात मारतंय बघा ! (गातो.)

सुधीर : आला आला. म्हणजे तुमच्या गाण्यावरून मला (बेबीकडे पाहून) यांच्या गाण्याचा अंदाज आला. एकूण काय (बेबीला) तुमचं माझं सहज जमेल.

गुंडुराव : अहो, आमी आहोत हितं जिवंत. मग कसं जमणार तुमचं ?

सुधीर : अरे हो ! तुम्ही जिवंत आहात, नाही का ?

बंड्या : ती एक अडचणच आहे.

सुधीर : नाही, म्हणजे मला असं म्हणायचं होतं की यांच्या प्रचारसभेत आमच्या दोघांचं कॉंबिनेशन चांगलं जमेल.

गुंडुराव . काका, ह्ये कॉंबिनेशन काय बोलतंय हो ? मला डेंजर वाटतंय बघा. हे चालू दिसतंय.

बाबासाहेब : गुंडुराव, तुम्ही यांच्यावर बारीक लक्ष ठेवा म्हणजे झालं. त्याला एकटयाला बेबीला भेटू देऊ नका.

गुंडुनाव : त्याचं काळजीच सोडा हो तुमी. चोवीस तास उभा राहतं बघा दगडासारखं त्यांच्यामध्ये— घट्ट ! खुश्शाल जावा तुमी. मी बघतंय हिकडं.

बाबासाहेब . तुम्ही आहात तर मला कसली हो काळजी ? चला. (सुधीरला) साहेब, आमची बेबी तुम्हाला मीटिंगच्या तारखा बिरखा काय ते

देईल. पैशाची कायपण अडचण न्हाई. आमचे सेक्रेटरी ती सगळी व्यवस्था करतील. मी आता जातो. बेबी, या साहेबांचं काम संपवून गुंडुरावांच्या संगट घरला ये बरं का !

बेबी : हो. (बाबासाहेब जाऊ लागतात.)

गुंडुराव : काका, थांबा हो. (सुधीरकडे पाहून) हे साहेब येताएत बघा सोडायला गाडीपर्यंत.

सुधीर : मी ? पण मी...

गुंडुराव : जावा हो. बाबासाहेबांसारख्या मोठ्या माणसाला पोचवण्याची रीत असते बघा. (सुधीरला ढकलतो.)

सुधीर : बरं बुवा, मी येतो. (जातो.)

गुंडुराव : गेलं. (एकदम गुडघे टेकून मागणीसाठी तयार होतो. शबनम पिशवीतून फुलांचा गुच्छ काढून तिच्यापुढे धरतो.) बेबी– बेबी– तू काय करतंय माझं ? घेऊन टाक की मनावर ! किती दिवस काढायचं हो उपास ?

बेबी : तुम्ही कशाला उपाशी राहता ? आणि तुमच्या उपाशी राहण्याशी माझा काय संबंध ?

गुंडुराव : संबंध ? भयंकर संबंध की गं जवळचा !
हवे तुझे दर्शन मजला नको गहू ज्वारी
बेबी तुझ्या दारी आलो होऊनी भिकारी–भिकारी–भिकारी–भिकारी

बेबी : अहो पुरे पुरे. सारखं तेच काय म्हणताय ?

गुंडुराव : ते काय झालं बघ, ते रेकॉर्डवरनं गाणं पाठ केलं ते रेकॉर्डला एक एवढं चरा पडलं होतं. ते रेकॉर्ड भिकारी भिकारी करायला लागलं तसंच मी पाठ केलं बघ.

बेबी ही चरे पडलेली रेकॉर्ड आता थांबवा. काय मेले नसते भिकेचे डोहाळे ! हे बघा, तुम्हाला काय पाहिजे ते तुमच्या... येळकोटरावांच्याकडून मागून घ्या, गुंडुराव.

गुंडुराव · आमाला पायजे ते आमचं बाप दिलं असतं तर तुझ्याकडं मागायला आमी गाढव का काय ?

गाढव : आम्हाला हो कशाला ओढताय तुमच्या प्रेमात !

गुंडुराव : आमच्या बानं बघा दोन बायका केलं. दोनी बायकानला पाच पाच दिलं बघा पोरं. रीत वगा घरान्याची. तिकडं बाप लगीन कर म्हणून मागं लागतंय, तुज्या घराकडं यायचं म्हटलं तर कुत्री मागं लागतात. (कुत्रा भुंकतो) बेबी, करून टाक की म्यारेज. (सुधीर येतो.)

सुधीर : (मध्येच) सॉरी हं ! पण तुमचं काही खाजगी तर चाललेलं नाही ?

गुंडुराव : अहो खाजगी नाही, तर काय जाहीर सभा चाललंय का हितं ? लवकर आला तुम्ही. दिला काय निरोप काकान्ला ?

सुधीर : त्यांना निरोप देऊन झाला. आता म्हटलं तुम्हाला निरोप द्यावा. या. या. (बेबीकडे बोट दाखवीत) यांना थांबू देत थोडा वेळ. कामाचं बोलायचं आहे त्यांच्याशी.

बेबी : खरंच गुंडुराव, तुम्ही त्या संध्याकाळच्या मीटिंगसाठी मायक्रोफोन, टेबल, पंखा आणायला जाणार होता ना ? मग जा ना लवकर.

गुंडुराव : वा ग वा ! मी जातो तिकडं लावायला पंखा, आणि तुम्ही फिरा हिकडं गरा गरा. मला काय तुम्ही अगदीच खुळा समजला काय ?

बेबी : छे : छे: अगदी नाही हो. थोडेसे तसे असला म्हणून काय झालं ?

सुधीर : हो तर. आणि अर्धवटांची काय जगात लग्नं होत नाहीत ?

वंड्या : माझं नाव का घेतलंत ? लग्न म्हटलं की माझं डोकं फिरतं बघा. (डोकं मानेभोवती फिरवतो.)

गुंडुराव : अरेच्या ! गंमत आहे की हो. कसं काय डोकं फिरवतंय् हो हे ? (स्वत: बाहुली चाचपतो.)

बेबी : अहो, त्या बाहुल्यांची कळ यांनाच माहीत आहे.

गुंडुराव : बरोबर बोललीस बेबी ! अग ह्ये पक्के चालू आहेत. कुठं बी हात घालतात आणि कळ दाबतात बघ. म्हणून काकानी मला सांगितलं, सेक्रेटरी, या दोघाना एकटं सोडू नका ! (सुधीर आणि बेबी एक-मेकाकडे पाहतात.)

बेबी : (कपाळाला हात लावून) अग आई ग !

गुंडुराव : (घाबरून तिला हातानं वारा घालीत) बेबी ! बेबी ! काय झालं तुला तुला ?

बेबी : अचानक भयंकर डोकं दुखायला लागलं की हो, गुंडुराव.

गुंडुराव : डोकं ? अर्धं का सबंध ?

सुधीर : ह्यांचं हे डोकं अर्धं आहे का ? सबंध डोकंसुद्धा ओळखता येत नाही ?

गुंडुराव : अहो हुबळीला एक बाई होतं तिचं अर्धशिशी होतं की ह्रो.

बेबी : गुंडुराव, तुम्ही समोर असताना अर्धं डोकं कशाला हो दुखेल ? सबंध दुखतंय आणि अगदी हैराण झाले हो.

गुंडुराव : (सुधीरकडे पाहून) तुमच्याकडं ॲस्पिरिन– ॲनासिन आहे का हो ?

(बेबी हातानं खूण करून 'नाही' असं म्हणायला सुचवते.)

सुधीर : नाही बुवा. अजिबात नाही.

बेबी । (लाडिकपणे) गुंडुराव, माझ्यासाठी बाहेर जाऊन ॲनासिन–ॲस्पिरिन घेऊन याल ना गडे ? प्लीऽऽज

गुंडुराव : हे प्लीज म्हटलं की बोंबलतंय बघ सगळं ! तुझं हे असं हुकूम झालं का का नाही जाणार ? हा आत्ता जातंय बघा आणि लगेच औषध घेऊन येतो.

बेबी : अहो, लगेच कशाला ? सावकाश आलात तरी चालेल.

गुंडुराव · अहो, आजारपणच्या कामाला उशीर म्हणजे पाप. समोरच आहे की वो केमिस्ट.

बेबी : आणि गुंडुराव, मला मोसंबी हवीत हो.

गुंडुराव : मोसंबी ?

बेबी : हो, मोसंबी.

गुंडुराव : मोसंबी म्हणजे तिकडं लांब मंडईत जायला लागेल की ग बेबी ?

बेबी : मग जा ना एक दिवस माझ्यासाठी. काय झालं गेलात तर ? तुम्हाला काय अवघड आहे ?

गुंडुराव : तसं अवघड काही नाही म्हणा. पन मी येईपर्यंत हे तुझ्या डोक्याचा भुसा पाडतील की गं.

बेबी : डोंट वरी. मी घेईन काळजी. एवढा माझ्यावर विश्वास नाही का तुमचा ?

गुंडुराव : एवढं ? विश्वास ? विश्वास नाही, तर बोंबललंच की सगळं.

बेबी : मग आणा ना.

गुंडुराव : आता विश्वास म्हणजे–

सुधीर : कळलं ! आता जा लवकर (गुंडू जातो. बेबीला) वा: वा: ! काय ॲक्टिंग आहे ! पिडा गेली बघा.

बेबी : डोकं दुखण्याचं ॲक्टिंग ना ?

सुधीर : ते नाही हो. वडलांना काय हातोहात फसवलंय आपण. यापूर्वी इतक्या वेळा भेटलो हे त्यांना कळूसुद्धा दिलं नाही.

बेबी : त्याचं काय आहे, राजकारणात पडलं ना की, असली नाटकं करावी लागतात.

(दोघेही हसतात. बाहुल्या थट्टेनं खाकरतात.)

बंड्या · हं. सुधीर, धीर करा. लवकर सुरू करा– बोलणं.

सुधीर : (चाचरत) तर ते. आपलं बाकीचं बोलायचं ते राहिलंच.
बेबी : ही आयडिया मुळात मीच काढली– बाबासाहेबांच्या सभेला गर्दी व्हावी म्हणून. शिवाय तुम्हाला भरपूर पैसे मिळतील.
सुधीर : हो ना. म्हणजे पुढच्या दृष्टीने उपयोगी पडतील पैसे.
बेबी : (अर्थ लक्षात येतो) म्हणजे ?
सुधीर : म्हणजे निवडणुकीच्या दृष्टीने...
बेबी : हां, निवडणुकीच्या ! मला वाटलं...
सुधीर : काय वाटलं ?
बंड्या : मज्जा वाटली !
बेबी : मग...
सुधीर : मग काय ?
बेबी : मग जाऊ मी?
सुधीर : छे: छे: अजून तुमच्याकडे असलेलं माझं काम कुठे झालंय ?
बेबी : नाही झालं ना ?बरं झालं. बोला, पण माझ्याकडे नक्की कसलं काम आहे तुमचं ?
सदा. : सुधीर, धीर करा. प्यार करने का फल...
बंड्या : आज नही तो कल.
सुधीर : (बिचकत) काय. म्हणजे काय आहे...
बाहुल्या : जोर लगाके हैया, जोर लगाके हैया, जोर लगाके हैया.
सुधीर : त्याचं काय आहे, मला काय म्हणायचंय...मला आपलं एक वाटलं...
बेबी : (उत्सुकतेनं) काय वाटलं ?
सुधीर : म्हटलं एकदा विचारून पहावं.
बेबी : पण काय ?
सुधीर : हं...(अडखळत)
बाहुल्या : और जोरसे. हैया. और जोरसे, हैया.
सदा विचारे: सरळ सांग ना तिला. तिला तेच हवंय.
सुधीर : गप्प बसा.
बेबी : काय म्हणतात, तुमचे ते...
सुधीर : सदा विचारे. हो, तर मला काय विचारायचं होतं की...म्हणजे माझी मागणीच आहे म्हणा की.
बाहुल्या : आले रे आले लायनीवर आले.
बेबी : कसली मागणी ? काही गाण्याबिण्याचा कार्यक्रम हवाय की काय तुम्हाला ?

सुधीर : हो. गाण्याचाच कार्यक्रम हवाय. मला नक्की काय मागायचं होतं तेच आठवत नव्हतं. तुम्ही बरोबर आठवण करून दिलीत. मला तुमच्या गाण्याचाच कार्यक्रम ठेवायचा आहे.

बंड्या : आता करा शंख !

बेबी : आँ ?

सुधीर : काही नाही. ते गाण्याचं म्हणत होता ना ?

बेबी : तुमची मागणी मान्य आहे मला. मी स्वीकार करते तुमच्या मागणीचा.

सुधीर : गाण्याच्या मागणीचा ना ?

बेबी : गाणंच हवं आहे ना तुम्हाला की आणखी काही हवंय ? तुम्ही अगदी कल्पवृक्षाखाली उभे आहात असं समजा आणि काय हवं ते मागा.

सुधीर : (घाबरत) कल्पवृक्ष ? अरे बापरे...

बाहुल्या : घाम फुटला हैया, घाम फुटला हैया !

सुधीर : मला वाटतं माझं डोकं दुखतंय !

बेबी : मी ॲस्पिरीन आणून देऊ का ?

सुधीर : छे: तुला कशाला त्रास ? तुला...तुला...तुम्हाला तुला म्हटलं तर चालेल ना ?

बेबी : चालेल ना, त्यात काय ! मग मी जाऊ?

सुधीर : अहो, पुन्हा येणार ना ? (ती जाते.)

बेबी : (आतून) हो !

सुधीर : कधी ? कधी ? कधी ?गेली.

(बेबी थोड्या वेळाने परत येते.)

बेबी : तुम्हाला धाडस झाल्यावर !

बाहुल्या : जोर लगाके हैया, जोर लगाके हैया !

सदा. हात तुझं जळलं लक्षण ! हात् तुझं जळलं लक्षण !

सुधीर काय झालं ?

सदा. नाही, तुला नाही.

बंड्या : तू मला आवडतेस. तू माझ्याशी लग्न करशील का ?

सुधीर : काय ?

बंड्या : तुला नाही रे, बेबीला !

सदा. : (गातो.) धीर तुला नसताना
सुधीर तू असताना
प्रेम कसे मग होईल सांग ना !

( सदा त्याच्या भोवती नाचतो )

सदा. : अरे, अकलेच्या कांद्या, अरे अळवाच्या गड्डया, चांगली संधी आली होती. तिला सरळ विचारायचं सोडून–

सुधीर : चूप. सदा विचारे. भलत्या बाबतीत मला तुमच्या सल्ल्याची गरज नाही. नको तिथं धाडस दाखवलं तर अंगाशी येतं !

सदा. : अरे अंगाशी यावी म्हणून तर असली गोड धाडसं करायची असतात.

बंड्या : मागणी घातली म्हणे ! कुठली ? तर गाण्याची ! हा हा हा...

सुधीर : बंड्या, तुझाही आगाऊपणा वाढत चाललाय अलीकडे. थांब, तुला तुझी जागा दाखवली पाहिजे. बस, जागेवर बस ! ( त्याला बाजूला ठेवतो. )

सदा. : हट् ! आम्ही नाही भित्र्या मुलाचं ऐकत !

(सुधीर बटण दाबतो. सदा कोसळतो. त्याला जागेवर बसवतो. हातात वर्तमानपत्र देतो. बटण दाबतो– सदा वाचू लागतो. )

सदा. . भारतातल्या मूर्ख लोकांनी स्वतंत्र मूर्खस्थानची मागणी. वा: वा: वा: सेंट्रल रेल्वेच्या अडतीस गाड्यांपैकी अर्धी गाडी चालू. वा: वा: वा: हनिमूनचा खर्च वाचवण्यासाठी नवरदेव एकटाच हनिमूनला गेला, वा: वा: वा:

सुधीर : आता काय चाललंय् ?

विचारे : बातम्या वाचतोय !

सुधीर : मग उद्याची बातमी आजच सांगतो. माजी आमदार बाबासाहेब टोणगे यांच्या प्रचार सभेत सुधीर पटवर्धन बाहुल्यांचे खेळ करणार!

सदा. : मग परवाची बातमी आत्ताच सांगतो. बाबासाहेब टोणगे यांच्या-सारख्या संधिसाधू माणसाला मदत केल्याबद्दल भर सभेत सुधीर पट-वर्धनला लोकांनी मार दिला,

सुधीर : वा: ? तुमची विनोदबुद्धी शाबूत दिसते हं.

सदा. : विनोदबुद्धी नाही, विवेकबुद्धी आहे ही. ती बाहुल्यांकडे नसली तरी चालते. पण माणसाकडे नसली तर त्याचा सुधीर पटवर्धन होतो.

सुधीर · तुझी स्वत:बद्दल काय समजूत आहे, विचारे ? विचारी, बुद्धिमान म्हणून चार लोकांच्या पुढे तुझं कौतुक केलं तर तुला खरंच तसं वाटायला लागलं की काय ? अरे, तुझ्यात प्राण आणतो मी. तुला नाचवतो मी. तुला स्वत:चा आवाज कुठं आहे ?

सदा. : आवाज दो. हम् एक हैं. (उभा राहतो. बाहुल्या त्याला साथ देतात.) वुई वाँट जस्टीस. (सुधीरला) तुला तरी स्वत:चा आवाज कुठं आहे? चार पैशासाठी तो तू मघाशीच विकलास– बाबासाहेब नावाच्या एका सौदेबाज माणसाला. त्याचे सगळे व्यवहार काळे.

बंड्या : पोरगी तेवढी गोरी

सुधीर : बंड्या, मोठ्या लोकांच्या गोष्टी चाललेल्या असताना लहानांनी मधे-मधे बोलू नये.

बंड्या : अहो सदा विचारे, गप्प बसा.

सुधीर : मूर्खा–

बंड्या : विचारे, तुम्हाला म्हणताहेत.

सुधीर : शू: गप्प बस! अरे आजपर्यंतचे सगळेच कार्यक्रम पैसे घेऊन केले तेव्हा तुमचं तोंड कुठे गेलं होतं ? पैसा घेतला नसता तर तुमची भरभराट झालीच असती का ? आणि हे बघ, शेवटी हा धंदा आहे. तुमची जेव्हा चलती असते तेव्हाच तुम्हाला मिळवून ठेवावं लागतं !

सदा. : आवाजकी दुनिया के दोस्तो, सुना तुमने ? हा आवाज याचा नाही. हा बाबासाहेबांचा आहे. पैशाचा आहे. (गातो.)

डोक्यात तुमच्या असतात पैसे
प्रेम कुणाचे दिसणार कैसे
कशास धरसी मार्ग चुकीचा हा अरेरेरेरे

जर हा आवाज फक्त प्रेमाचा असता तर त्या प्रेमाला आम्ही प्रतिसाद दिला असता.

सुधीर : हे बघा, आता मी बाबासाहेबांना शब्द दिला आहे. यावर चर्चा नको. मी सभेत प्रचार करणार नाही– फक्त बाहुल्यांचे खेळ करणार.

सदा. : म्हणजे बोहोल्यावर उभं राहायचं आणि म्हणायचं, मी लग्नाला उभा नाही !

सुधीर . हे बघा, माझा निर्णय अंतिम आहे.

सदा. आमच्या प्रतिसादाशिवाय ?

सुधीर मी तुला नेणारच नाही.

सदा. . ते बरोबर. अशा सभेला जायचं म्हणजे बुद्धी घरी ठेवूनच जावं लागणार. मग बघच, उद्या आम्ही तुला कसं नाचवतो ते.

सुधीर : काय ?

सदा. : आगे आगे देखिए– होता है क्या !

( अंधार– पहिला अंक समाप्त )

* *

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

(सार्वजनिक सभेचे स्थळ. गुंडुराव हातात मायक्रोफोन घेऊन येतो व तो बसवितो. मग तो चार खुर्च्या आणून मायक्रोफोन-जवळ मांडतो.)

गुंडुराव : (मायक्रोफोनवर) कोण रे त्यो ? आता हितं बाबासाहेबांचं सभा होणार आहे. ते बाबासाहेब टोणगं– त्याचं. त्याच्या आधी भावलीवाले पटवर्धन तुम्हाला भावल्याचं खेळ करून दाखवणार आहेत. गप बसा रे. ( आत जातो. बाबासाहेबांना घेऊन येतो.)

गुंडुराव : (घोषणा देतो) बाबासाहेब टोणगे की– जय. बाबासाहेब टोणगे की– जय.

बाबासाहेब : अहो गुंडुराव, तुम्हीच बाबासाहेब म्हणता नि तुम्हीच जय म्हणता ? माणसं हाईत का हिथं ?

गुंडुराव : ही काय, समोर बसलेली चार पोरं ?

बाबासाहेब : एवढीच ? अहो किती माणसांचे पैसे घेतले आणि हिथं भाषणाला ही चार पोरं ? आधी माणसं जमवा. मग मला बोलवा.

गुंडुराव : ते भावलीवालं आल्यावर जमतील की हो मानसं.

बाबासाहेब . कुठं आहेत ते सुधीर पटवर्धन ?

गुंडुराव : येतंय् की हो ते आता.

बाबासाहेब : मग ते आल्यावर, गर्दी झाल्यावर येईन मी. तोपर्यंत ह्यांना सांगा की बाबासाहेब दुसऱ्या मीटिंगला गेलेत. ती आटपून येताहेत. (बाबा-साहेब जातात)

गुंडुराव : (मायक्रोफोनवर) ते टोणगं दुसऱ्या मीटिंगला गेलंय. तिथं ते आटप-ल्यावर येतंय् ते. (सुधीर पटवर्धन बाहुल्यांच्या बॅगा घेऊन येतो.) तोपर्यंत ह्यांचे भावल्यांचे खळ बघा. गप बसा रे पोरांनो– हां, ऐका आता.

(सुधीर शामू आणि गंपू या बाहुल्यांना मांडीवर घेऊन बसतो.)

सुधीर : शामू, आणि गंपू— तुम्हाला सभेला यायला उशीर का झाला ?
शामू : येताना वाटेत माझा रुपाया पडला. तो शोधताना वेळ गेला.
सुधीर : बरं गंपू, तूला का वेळ झाला ?
गंपू : मी त्या रुपयावर पाय ठेवून उभा होतो. म्हणून मला उशीर झाला.
सुधीर : बरं, ते राहू दे. आता मी वर्ग सुरू करतो. मुलांनो—
शामू } : ओ ऽ ऽ
गंपू } :
सुधीर : आणि मुलींनो—
शामू : कुठं आहेत मुली ?
सुधीर : अरे, येतील.
गंपू : मग त्या आल्यावर वर्ग सुरू करा, सर.
सुधीर : (रागावून) गप बसा रे. एक शब्द बोलू नका, हं. आज कोणता विषय शिकवायचा आहे ? (शामू व गंपू दोघेही गप बसतात.)
सुधीर ओ, सांगा ना. आज कसला तास आहे ? (कोणीच बोलत नाही.)
सुधीर तुम्ही बोलत का नाही ?
शामू तुम्हीच आम्हाला गप बसायला सांगितलंत म्हणून.
सुधीर : अरे, मूर्खांनो, त्याचा अर्थ उगीच बडबड करू नका, दंगा करू नका असा आहे. आज कसला तास आहे ?
गंपू : इतिहासाचा.
सुधीर : ठीक आहे. मी तुम्हाला इतिहास शिकवतो.
शामू : नको सर. इतिहास नको.
सुधीर : का रे ?
शामू इतिहास म्हणजे काय, सर ?
सुधीर . इतिहास म्हणजे पूर्वी होऊन गेलेल्या गोष्टी.
शामू : म्हणूनच म्हणतो सर, इतिहास नको. परवा तुम्हीच सांगितलं होतं आम्हाला— झालं गेलं विसरून जा म्हणून.
सुधीर . मी ? केव्हा सांगितलं ?
शामू : होय सर. माझं आणि या गंपूचं भांडण झालं तेव्हा तुम्ही म्हणालात, जे झालं ते विसरून जा.
सुधीर अरे, ते भांडणाबद्दल म्हणालो मी.
गंपू · सर, मग इतिहास म्हणजे भांडणच. शिवाजीचं आणि औरंगजेबाचं

भांडण. ह्याचं आणि त्याचं भांडण.

शामू : नको. नको. इतिहास नको, सर.

सुधीर : बरं तर. भूगोल शिकवतो.

गंपू : भूगोल नको.

सुधीर . का रे ?

गंपू : मला पोहायला येत नाही.

सुधीर : पोहायला ? गंपू, भूगोल शिकायला काय पोहावं लागतं ?

गंपू : होय सर. त्या भूगोलाच्या पुस्तकात पाच समुद्र आणि कितीतरी नद्या आहेत. मी परवा त्यांतल्या एका समुद्रात पडलो ना !

सुधीर : काय रे शामू ? तुझं काय म्हणणं ? भूगोल शिकवू का ?

शामू : नको सर, पृथ्वी गोल आहे त्याचा मला फार त्रास होतो.

सुधीर त्याचा काय त्रास होतो रे तुला ?

शामू : सर, तुम्ही मला भूगोलाच्या पेपरात पृथ्वीसारखेच गोल मार्क देता. मग माझे बाबा मला मारतात !

गंपू : मलासुद्धा भूगोलात मार बसतो सर. पृथ्वी गोल आहे, ही काय आमची चूक आहे ?

सुधीर तर मग इंग्रजी शिकवू ?

शामू . नको नको.

सुधीर : का रे ?

गंपू : सर, इंग्रजी हटाव झिंदाबाद. आपल्या मराठीचा रिस्पेक्ट ठेवला पाहिजे सर.

शामू : होय. होय. मराठीचा इन्सल्ट होतो इंग्रजी शिकलं तर. इंग्रजी गो बॅक !

सुधीर . बस् ! मी गणित शिकवतो तुम्हाला. इकडं आणा तुमच्या वह्या. (वह्या हातात घेतल्याचा आविर्भाव) अरे ! काल तुम्हाला गणितं घातली होती. एक दोन तीन चार आकडे होते. कुठं आहेत ते आकडे ? आज दोघांच्याही गणिताच्या वह्या कोऱ्या कशा ?

गंपू : सर, ते आकडे आमच्या आईनं घेतले.

सुधीर (आश्चर्यानं) आईनं घेतले ? कशाला ?

गंपू · डोक्यात घालायला. तिचे केसात घालायचे आकडे हरवले. म्हणून तिनं आमचे गणितातले आकडे डोक्यात घातले.

सुधीर : मूर्ख आहात तुम्ही. बरं, मी आता तुम्हाला एक सोपं गणित घालतो.

शामू, गंपू : घाला सर.

सुधीर : दोन उणे दोन किती ?
गंपू : (मोठ्याने हिशोब करतात) आठ दुणे सोळा उणे पाच उरले नऊ.
शामू . चार त्रीक तेरा. अधिक सात बरोबर नऊ. हातचा आला एक उणे वीस बरोबर.
सुधीर : अरे एवढे मोठे हिशोब कसले चालले आहेत ?
गंपू : थांबा सर. जरा बाजूला व्हा.
सुधीर : कशाला रे ?
शामू : ते येताहेत.
सुधीर : कोण ?
गंपू : गणितातले हातचे येताहेत.
सुधीर : तुम्ही अगदी मठ्ठ डोक्याचे आहात. अरे दोन उणे दोन या गणितात हातचे कसे येतील ?
शामू : ते हातचे येतो म्हणाले सर. नऊ दुणे अकरा उणे पंचवीस बरोबर तेवीस–
गंपू : पाच सत्ते बावीस हातचे तेवीस बरोबर–
सुधीर : (ओरडून) झालं की नाही गणित ?
शामू : झालं सर.
गंपू : झालं सर.
सुधीर : हां. शामू, तुझं उत्तर सांग.
शामू : दोन उणे दोन बरोबर एक.
गंपू : दोन उणे दोन बरोबर दोन.
सुधीर : शहाण्याला वेड लावाल तुम्ही. शामू, एक हे उत्तर कसं काढलंस तू ?
शामू : सर, चार त्रीक तेरा हातचे आले–
सुधीर : मूर्खा, कसलं हे गणित करतोस ? सरळ समजून घे. या वर्गात तुम्ही दोन मुलं आहात. तुमच्यापैकी दोघांनाही मी वर्गातून बाहेर जायला सांगितलं, तर वर्गात किती उरतील ?
शामू : एक. सर, तुम्ही उराल ना वर्गात. (आनंदानं) माझं गणित बरोबर, माझं गणित बरोबर.
सुधीर · गंपू. दोन उणे दोन बरोबर दोन हे उत्तर तू कसं काढलंस ?
गंपू : सर, तुम्ही मला आणि शामूला वर्गाबाहेर जायला सांगितलंत, पण आम्ही गेलोच नाही. म्हणजे वर्गात दोन मुलं उरली. दोन उत्तर बरोबर. माझं गणित बरोबर, माझं गणित बरोबर. (मोठ्यानं हसतो.)

शामू : हसू नकोस. हसू नकोस. तुझे बत्तीस दात पाडीन.

गंपू : मी चौसष्ट दात पाडीन.

सुधीर : ओ गंपू, माणसाला फक्त बत्तीसच दात असतात. मग तू चौसष्ट कसे पाडणार ?

गंपू : मला माहीत आहे की तुम्ही मध्ये पडणार. बत्तीस दात तुमचे धरलेत !

सुधीर : तुम्हाला एकही विषय येत नाही. आता मी तुम्हाला संस्कृत शिकवतो. संस्कृतमध्ये कानाला काय म्हणतात ?

शामू : तुम्हाला माहीत आहे काय ?

सुधीर : हो. माहीत आहे.

गंपू : मग सांगून टाका ना. उगीच कशाला आम्हाला त्रास ?

सुधीर : संस्कृतमध्ये कानाला म्हणतात– कर्ण. आता सांगा. संस्कृतमध्ये नाकाला काय म्हणतात ?

शामू : नर्क !

सुधीर : छे: छे: संस्कृतचा तुमच्या पुढं काही उपयोग नाही. आता मी तुम्हाला व्यवहारातलं गणित घालतो. असं बघा. तुम्ही पाच किलो गहू तीस रुपयांना आणले तर गहू कोणत्या दरानं आणले ?

शामू : मागच्या दारानं !

सुधीर : तसं नव्हे रे, कोणत्या भावानं आणले ?

गंपू : धाकट्या भावानं आणले.

सुधीर : ओ, कोणत्या रेटनं आणले ?

शामू : आता पुरे करा सर. आणखी किती रेटणार ?

सुधीर : छे: छे: तुम्हाला काहीही येत नाही. अगदी धड्डोबा आहात तुम्ही. पुढं कोण होणार आहात तुम्ही ?

शामू : पुढारी !

सुधीर : पुढारी ?

गंपू : ह्या बाबासाहेबांसारखे ? (लोक टाळ्या वाजवतात)

बाबासाहेब : बास झाले तुमच्या बाहुल्यांचे खेळ.

(सुधीर बाहुल्या घेऊन आत जातो.)

बाबासाहेब : (गुंडुरावाला) खासदार, ह्या भावल्यांनी काय हा चावटपना मांडलाय ?

(खुर्चीवर बसलेल्या व पुढाऱ्याच्या वेषातील काकासाहेब कावळेला घेऊन सुधीर येतो.)

सुधीर : लोक हो. बाबासाहेब टोणगे यांची–

बाबासाहेब : माजी... माजी आमदार.

सुधीर · बाबासाहेब टोणगे माजी आमदार यांची ओळख करून देतील बाहुल्यांचे पुढारी काकासाहेब कावळे.

(खुर्चीवर बसलेला पुढाऱ्यांच्या वेषातला कावळा घेऊन येतो.)

काका · सभ्य गृहस्थहो, बाबासाहेब टोणगे–

बाबासाहेब · माजी माजी !

काका . हो, तेच ते ! माजी आमदार बाबासाहेब फार मोठे आहेत !

बाबासाहेब · कसचं कसचं ?

काका : वयानं ! (कोरस–हसणे) शू: तर बाबासाहेब म्हणजे फार थोर माणूस होऊन गेले !

सुधीर : अहो, आहेत आहेत !

काका : हो, तेच ते ! ते फार थोर देशभक्त, समाजसुधारक, लोकनेते आहेत. (बाबासाहेब हसून त्यांच्याकडे बघतात.) असं त्यांना वाटतं. (कावळ्याला जोरात शिंक येते. टोपी खाली पडते.)

सुधीर · अहो, अहो तुमची टोपी पडली.

काका : तर ह्ये बाबासाहेबसुद्धा अशाच टोप्या बदलतात. अहो टोपी बदलली.

बाबा. : (चिडून) आरं, काय बोलता काय तुमी ?

सुधीर (समजावणीच्या सुरात) नाही नाही, काकासाहेबांना असं म्हणायचंय की तुम्ही मळल्यावर टोपी बदलता की नाही ?

बाबा. : हां, पुढं बोला.

काका : बाबासाहेब म्हणजे ज्ञानाचा समुद्र आहेत. बाबासाहेब हे डोंगर आहेत.

बाबासाहेब डोंगर ?

काका : अहो, त्यागाचा डोंगर.

बाबासाहेब हां. हां.

काका ; आता मी या डोंगराला भाषण करण्याची विनंती करतो.

(भाषण करतात.)

बाबा. : बंधूंनो आणि भगिनींनो, मी बाबासाहेब टोणगे.

काका . माजी माजी माजी (लोक हसतात.)

बाबासाहेब : त्येच हो ! शू: शू: शांत बसा !

गुंडुराव : गप्पा ! काका, प्रत्येकाला सात सात रुपये मोजून दिलेत की हो ! पैसा काय फुकटचा घेतात काय ? एवढी तरी शिक्षा भोगायला नको का ?

बाबा : आमचा जन्म देशाची सेवा करण्यात गेला. शाळेत असताना पहिलीच्या पुस्तकातल्या व्हिक्टोरीया राणीला मिशा काढणारे आम्हीच. तरीबी ब्रिटिश सरकार जाईना. मग आम्ही साखर सोडली. तरी बी सरकार जाईना. मग आम्ही देशासाठी...

काका : लाज सोडली.

बाबा. : लाज सोडाया आमी काय विरोधी पक्ष हाय ? देशासाठी आम्ही घरंदारं सोडली. लोकशाहीच्या बाबतीत आम्ही अमेरिकेचे प्रेशिडेंट—कोण हो त्ये ?

गुंडुराव : मला काय माहीत ? आमच्या हुबळीला कधी आलं न्हाई हो त्ये.

सुधीर : अब्राहम लिंकन आपले.

बाबासाहेब : त्येच ते. तर बाबुराव लिंकन यांनी मला एकदा विचारलं, 'मिस्टर बाबासाहेब, व्हॉट इज डेमॉक्रशी ?' मी म्हटलं, 'कशी ?' त्यावर बाबुराव लिंकन म्हणाले, 'डेमॉक्रशी इज बाय द पीपल' म्हणजे लोकशाहीत मानसं विकत घ्या. बाय म्हणजे मानसं विकत घ्या. (बाहुल्या हसतात. प्रेक्षकही हसतात.)

बाबासाहेब : (सुधीरला) अहो भावलीवाले, तुमच्या ह्या भावल्यांना आवरा की हो. आमची चेष्टा करत्यात म्हणजे काय ?

सुधीर : (बाहुल्यांना) गप बसा रे. (बाबासाहेबांना) चालू दे तुमचं चऱ्हाट साहेब.

बाबासाहेब : कष्टाच्या बाबतीत आम्ही आमच्या वडलांना मानतो. त्यांना अकरा मुलं होती.

सुधीर : म्हणजे फार कष्ट की हो !

बाबासाहेब : तसं नाही हो. अकरा मुलांचं शिक्षण-बिक्षण करायचं म्हणजे काय कमी कष्ट आहेत का ? प्रामाणिकपणाच्या बाबतीत आम्ही आमचे थोरले बंधू भाऊसाहेब यांना मानतो. ते पोलिसात होते.

काका . आणि तरीही प्रामाणिक होते ?

बाबासाहेब : (रागानं) हो. हो. तरीही प्रामाणिक होते. त्यांनी कधी एक पैसाही जास्त घेतला नाही.

काका ठरलेल्या हप्त्याच्यावर !

बाबासाहेब : आम्ही आमच्या मतदारांना आश्वासन देतो की, आम्ही ( प्रेक्षकात ओरडा, गडबड, टाळ्या, हुर्ये. 'बाहुल्यांचा खेळ दाखवा' असा ओरडा.)

बाबासाहेब : (सुधीरला) अहो, आता लोक भाषण ऐकत नाहीत की हो ! भावलीचा खेळ पाहिजे म्हणतात. तुम्हीच सांगा त्यांना !

सुधीर : लोक हो शांत रहा ! तुम्हाला भावल्यांचे खेळ पहायचे आहेत ना.

प्रेक्षक : हो. हो.

सुधीर : मग, बाबासाहेब तेच खेळ करून दाखवत आहेत. मी माझ्या हातात बाहुलीची कळ ठेवून खेळ करतो. पण बाबासाहेब इथं खेळ करून दाखवतात आणि त्यांची कळ आहे दिल्लीच्या हातात ! दिल्लीहून कळ दाबली की बाबासाहेबांचा हात हालतो, पाय वर होतो !

(प्रेक्षकांत टाळ्या.)

बाबासाहेब · तुम्ही व्हा बाजूला. बंधूंनो आणि भगिनींनो—

(प्रेक्षकात हुर्रे, आरडाओरडा.)

बाबासाहेब · तुम्हाला भाषण ऐकाचं हाय का न्हाई ?
(गुंडुरावाकडे पाहून) हे बघा, उठून चालायला लागली मानसं. वो गुंडुराव. त्या पोलिसांना सांगा— सोडू नका म्हनावं त्यास्नी ! अहो माणसी सातसात रुपय दिलेत ते घ्या ! एकूण एक माणसं गेली. काय हे ? तुमच्या भावल्यांनी सभेचा सगळा इचका करून टाकला.

सुधीर · हे बघा, खेळ करून मी गर्दी जमवली. ती टिकवणं तुमच्या हातात होतं. आपलं काँट्रॅक्ट फक्त खेळ करायचं आहे. मी इथे तुमचा प्रचार करायला आलेलो नाही.

बाबासाहेब (रागावून) अवो खासदार, तुमी तरी कसली मानसं गोळा करून आणली आहेत ही सभेला ! एकाला तरी अक्कल असेल तर शपथ! आणि हे बघा भावलीवाले, हे असं चालायचं न्हाई म्होरं ! तुमच्या भावल्या मधीमधी बोलल्या तर माझ्याशी गाठ आहे. लक्षात ठेवा. बंडखोर आमदारांना सरळ करायचं प्रॅक्टीस हाय मला ! बेबी ? कुटं गेली बेबी ?
(बेबी येते.)

बेबी : पण बाबा कधी नव्हे ती गर्दी झाली होती ! मी काय म्हणत होते–

बाबासाहेब : काय बी म्हणू नको.

सुधीर : पाहिजे तर तुमच्या बेबीला विचारा आपलं काय ठरलं होतं !

बाबासाहेब : माझ्या तंगड्या खेचायच्या ठरलं होतं ?

बेबी : तसं नाही ! काही तरी गोंधळ झालाय, पण आपण इथं भांडू या नको. नाहीतर भांडण बघायला गर्दी जमेल.

बाबासाहेब : गर्दी जमली, तर मी पुन्हा भाषण ठोकीन !

सुधीर : हे बघा, माझा कार्यक्रम हा असा आहे. तो पसंत नसेल तर मी चाललो.

बेबी : अहो, थांबा, थांबा. यातून आपण काहीतरी मार्ग काढू.

गुंडुराव : आता मार्ग फक्त एकच ! घरचा. ह्यांना घरला पाठवा.

बेबी : (सुधीरच्या मागोमाग जाताना) अहो, पण पटवर्धनसाहेब– (बेबी व सुधीर जातात).

गुंडुराव : अरे ! ह्ये बेबी पण गेलं की हो त्येच्याबरोबर.

बाबासाहेब : पन हिनं त्याचा एवढा का हट्ट धरावा ? काहीतरी गडबड दिसतीया. (गुंडुरावाला) गुंडुराव, मी तुमच्यावर एक जबाबदारी सोपवणार आहे.

गुंडुराव : (उत्साहानं) हा मी तयारच आहे की हो. सांगा.

बाबासाहेब : ते काम तुम्हीच करू शकाल. मोठ्या विश्वासानं मी ते तुमच्यावर सोपवतो.

गुंडुराव : करून टाकतो की हो. काय ते सांगा नुसतं.

बाबासाहेब : हे सगळं आवरा. मी जातो. (जातात.)

गुंडुराव : (निराशेनं) काय हो हे सभा ? एक माणूस उभा राहील तर शपथ बघा ! ह्या माईकच्या बांडक्यात तोंड घालून काय बडबड बड करतंय कुणाला म्हाईत. आता सेक्रेटरी असून मी झाडूवाल्याचं काम करतंय की हो. ह्ये समदं एकट्यानं आवरायचं म्हंजे पिडाच की हो. ह्यांनी मोडायचं आनि आमी आवरायचं ! पन बेबीचं नि आमचं मोडलं तर आवरायला कोन येनार हो ?

(खुर्च्या घेऊन आत जात असतानाच अंधार.)

* *

# अंक दुसरा

## प्रवेश दुसरा

(सुधीरचे घर. सुधीर खांद्यावर टॉवेल घेऊन येतो.)

सदा. : काय ती आली नाही वाटतं ?

सुधीर : ती या वेळी कशाला येईल ? आणि हे बघ सदा, ती येईल नाही तर नाही येईल तुला काय करायचं आहे ?

बंड्या : छे: छे: काय करायचं ते तुम्हालाच करायचं आहे.

सुधीर . (रागानं) बंड्या, फाजीलपणा करू नकोस.

बंड्या : तो सुद्धा तुम्हीच करायचा आहे. पण ती आली का ?

सुधीर : हे बघ, मी तिची वाट पाहात नाही. मी आंघोळीला निघालोय.

बंड्या : तेच विचारतोय ती आली का ? म्हणजे आंघोळीची वेळ आली का ?

सुधीर : तुला काय करायचं आहे माझ्या आंघोळीशी ? स्वत: सहा सहा महिन्यांत एकदासुद्धा आंघोळ केली नाही !

बंड्या : त्याचं काय आहे–

सुधीर : काय आहे ?

बंड्या : तुम्ही आंघोळीला गेलात की ठकी मला भेटणार आहे !

सुधीर : पण मूर्खा, आंघोळीला पाणी असावं लागतं. नळाला नाही पाणी. (घंटा वाजते.)

कावळी : ती आली. ती आली.

बंड्या : सुधीरराव, कपडे काढा–

सुधीर : (रागानं) बंड्या !

बंड्या : मी म्हणतोय, कपडे काढा ठेवणीतले. चांगले कपडे घाला. आणि दार उघडा.

सुधीर : (खांद्यावर टॉवेल आणि हातात साबण घेऊन उठतो.) मला तुझ्याशी मस्करी करायला वेळ नाही. इतक्या सकाळी ती कशाला येईल ?

(दार उघडते. दारात बेबी उभी असते.) अरे, तू आलीस ? ये ना. आत ये.

बेबी : आश्चर्य वाटलं ना ? तुम्हाला असंच सर्प्राईझ करायचं होतं मला.

सुधीर : सर्प्राईझ म्हणजे ? मला वाटलं आता तू येणारच नाहीस.

बेबी : का ?

सुधीर : का म्हणजे ? अग परवा तो बाबासाहेबांच्या सभेचा समर प्रसंग झाला ना ? तेव्हा म्हटलं, आता संपलं सगळं !

बेबी : सगळं संपायला काय झालं ? आणि मी बरी संपू देईन ? मी सांगितलं बाबांना, की अहो, कधी नाही ती पहिल्यांदाच सभेला गर्दी झाली म्हणून. पण तुमच्या बाहुल्यांनी मात्र त्या दिवशी जरा जास्तच गोंधळ केला हं. चक्क बाबासाहेबांचं भाषण पाडायला सुरुवात केली त्यांनी.

सुधीर : हं. ते जरा यांचं जास्तच झालं.

बेबी : (पाकीट देत) हा चेक. तुम्हाला देण्यासाठी केव्हापासून बाबांनी त्या गुंड्याला दिला होता. त्याची नजर चुकवून आणला. मेला सतत माझ्या पाळतीवर असतो.

बंड्या : चेक माझ्या खिशात ठेवा.

बेबी : (बंड्याच्या खिशात चेक ठेवून) नाही, म्हटलं न कळवता आले. तुम्ही काही महत्त्वाच्या कामात तर नव्हता ना ?

सुधीर : छे: छे: अहो, आंघोळीला निघालो होतो.

बेबी : मग ?

बंड्या : पण त्यांच्यात पाणी नाही.

सुधीर : (रागावून) बंड्या !

बंड्या : बाथरूमच्या नळात पाणी नाही !

सुधीर : मी आलोच. तू बस जरा.

कावळी : ती आली, ती आली. काव काव. (मोटारीचा आवाज.)

बेबी : (घाबरून) अग बाई ! आमच्या बाबांचीच ही मोटार ! मी चोरून आले इथं. मला तुमच्या बरोबर बाबांनी पाहिलं तर सगळं संपलंच. आता काय करायचं ?

सुधीर : काळजी करू नकोस. आधी दार लावून घे. (बेबी दार लावून येते.) माझ्या हातात एवढ्या बाहुल्या असल्यावर तुला काय काळजी ? (आत जाऊन एका मोठ्या बाहुलीचा मुखवटा व कपडे घेऊन येतो व ते बेबीच्या अंगावर चढवून तिला बाहुलीसारखी उभी करतो. मग आपल्या तोंडावर एका वृद्ध माणसाचा मुखवटा चढवून कडी काढून

येतो व पुतळ्यासारखा उभा राहतो.)

(बाबासाहेब आणि गुंडुराव येतात.)

बाबासाहेब : हात्तीच्या ! अहो दार उघडंच होतं. आणि आत कोणीच नाही.
गुंडुराव : काय तरी गडबड आहे बघा ! भानगड म्हणायची तर !
बाबासाहेब : छे: छे: अहो सुधीर आणि बेबी इथं असती तर दार असं उघडं टाकलं असतं का ? भानगडी कशा करत्यात ते तुम्ही आमासनी शिकवता ? (मोठ्यानं) सुधीरराव, अहो पटवर्धनसाहेब–
गुंडुराव . (इकडे तिकडे पाहत) काय हो, केवढे हो हे भावलं– म्हणता– याचं!
बाबासाहेब : गुंडुराव, अहो तुम्ही बेबीला हुडकायला आला का भावल्या बघायला ?
गुंडुराव : तेच करतोय की. (दोघेही इकडे तिकडे हिंडत शोध घेतात. गुंडुराव वृद्धाच्या पुतळ्याजवळून जात असता वृद्ध एकदम त्याच्या खांद्यावर हात ठेवतो.)
गुंडुराव : (दचकून) कशाला बोलावलं हो आता तुम्ही ?
बाबासाहेब : काय म्हणता ? मी कुठं तुम्हाला बोलवलं ?
गुंडुराव : आत्ताच माझ्या खांद्यावर हात ठेवलात की ?
बाबासाहेब : मी ? अहो इतक्या लांबनं माझा हात खांद्यापर्यंत पोचेल का तुमच्या? गुंडुराव, माझे हात लांब न्हाईत. तुमचं कान लांब असतील बघा. (दोघेही पुन्हा शोधाशोध करू लागतात. वृद्धाचा पुतळा हलतो आणि मागून बाबासाहेबांची टोपी काढून घेतो.)
बाबासाहेब : (रागानं) गुंडुराव ! ही चेष्टा बरी नव्हं. माज्या टोपीला हात लावायचं काम न्हाई. एक वेळ पुढाऱ्याच्या धोतराला हात घातला तर चालंल. पण त्याच्या टोपीला हात घातलेला अजिबात चालणार नाही !
गुंडुराव (आश्चर्यानं) मी ? अहो काका, मी कशाला तुमची टोपी घेऊ हो ? इथं लांब आहे ना ?

(वृद्ध बाबासाहेबांच्या खिशातलं पाकीट काढून घेतो.)

बाबासाहेब : टोपीला तुम्हीच हात लावलेला आहे. उगाच काहीतरी बोलू नका.
गुंडुराव पैज लावताय का ?
बाबासाहेब : (खिशात हात घालून) हां हां. लावा पैज. हे घ्या माझं शंभर रुपय. अरेच्या ! पाकीट कुठं गेलं माझं ? खासदार, कर्नाटकात हेच धंदे करता काय ? पाकीटमारीचे ?

गुंडुराव : अहो, मी कशाला पाकीट घेऊ हो तुमचं ?

बाबासाहेब : मग इथं दुसरं कोण ह्याय ?

सुधीर : मी आहे ना. (बाबासाहेबांचं पाकीट परत देतो) हे घ्या पाकीट तुमचं. (वृद्धाच्या मुखवट्याला पाहून गुंडुराव घाबरून लांब पळतो. सुधीर मुखवटा काढतो.)

बाबासाहेब : खासदार या, या हिकडं, आपण इथं कशासाठी आलो ते विसरून नुसतं पळत काय सुटलात ?

गुंडुराव : तुम्हाला काय वाटलं मी घाबरून गिबरून गेलो काय ? मी बेबीला हुडकतोय हो. तर पटवर्धन, आम्ही तुम्हाला जाब विचारायला आलोय. चौकशी करायला आलोय. शोध घ्यायला आलोय, हुडकायला आलोय.

बाबासाहेब : (ओरडून) शटाप ! अहो, कसला शोध, सांगा की सरळ.

गुंडुराव : हो, तर आता सरळपणानं ते बेबी कुठं ठेवून दिलं ते सांगायचं बरं का.

सुधीर : अहो पण मी...कमाल आहे ! तुमच्या बेबीला इथं लपवून मी काय करू ?

गुंडुराव : काय करू ? तुम्ही मस्त कराल. पण आम्ही दिलं पाहिजे की करून !

बाबासाहेब : (धमकीच्या स्वरात) हे बघा मिस्टर पटवर्धन, माझ्याबरोबर सरळ वागणाऱ्याला मी चांगला आहे. पण माझ्याबरोबर कुणी बेईमानी केली, तर माझ्यासारखा वाईट माणूस कोणी नाही. मी सरळ पोलिसात तक्रार करून तुम्हाला अटक करीन.

सुधीर : अहो बाबासाहेब, एवढं गरम व्हायला काय झालं ! घर उघडंच आहे. तुम्ही स्वतः शोध घ्या. तुमची मुलगी सापडली तर खुशाल घेऊन जा तिला. मग तर झालं ?

बाबासाहेब : (गुंडुरावला) काय हो खासदार ? नक्की नाही बेबी ? (शोधतात.) इथं नाही बेबी ! कसली बोगस बातमी आणलीत तुम्ही ?

गुंडुराव : मी छातीवर हात ठेवून सांगतो, बेबी इथंच आहे. ते पानवाल्यानं फोन करून सांगितलं ते खोटं काय ? सगळं बारीक सारीक हुडकून येतंय मी.

सुधीर : ठीक आहे, बघा ना.

बाबासाहेब : अहो गुंडुराव, सगळा कोपरान् कोपरा धुंडाळला ना. हिथं बेबी नाही म्हणजे नाही. चला आत्ता. (गुंडुरावाला उंच बाहुली आणि बेबीसारखे पाय दिसतात.)

गुंडुराव : (आनंदानं) काका ! सापडली ! बेबी सापडली. या भावल्यात बेबीला लपवून ठेवलीय् बघा.

सुधीर : अहो, पण मला खरंच काही माहीत नाही. (गुंडुराव बाहुलीचा हातं खेचतो. तो तुटून गुंडुरावाच्या हातात येतो. सुधीर संतापतो.) अहो, काय वाट लावताय त्या बाहुलीची ! अहो, त्या बाहुल्यांच्या किंमती हजार हजार रुपये असतात.

बाबासाहेब : अहो ही बाहुली हाये. काय तुमचं डोकं हाय का ठिकाणावर, खासदार ? बटाटे भरा त्या मडक्यात. माफ करा पटवर्धन साहेब. तुम्हाला त्रास दिला. (गुंडुरावाला) चला आता परत खासदार. आई माई सॉरी (दोघे जातात.)

सुधीर : ऑल क्लीअर.

(बेबी मुखवटा काढते.)

बाहुल्यांचे गाणे आ...आ...आ...आ...जा जा जा आँ तुझा आजोबा आलाय.

बेबी : थँक्यू माय डिअर...

(गुंडु व बाबासाहेब पुन्हा परत येतात.)

गुंडुराव : काका, ह्यो बगा सूर्य आणि हे चंद्र !

बाबासाहेब : बेबी, हे काय चाललंय ?

बंड्या : नेहमीचंच. एवढं पण कळत नाही ?

बाबासाहेब : ए भावल्या, गप बस. मस्करी पुरे आता. (सुधीरला) ही चाल काय तुझी ? ए भावलीवाल्या, आजपासून बेबी बंद !

गुंडुराव म्हणजे मुंबई बंद, तशी ?

बंड्या . पण त्यांचं प्रेम आहे एकमेकांवर !

बाबासाहेब . ते गेलं खड्ड्यात. निवडणूक म्हणजे काय सिनेमा वाटला काय तुम्हाला ? हे बघा, आता नसता बाहुलीचा खेळ करायचा विलेक्शन होईपर्यन्त. बेबी, खबरदार पुन्हा या बाहुलीवाल्याला भेटलीस तर !

गुंडुराव : चांगली शिक्षा करा. लग्न करून टाका तिचं माझ्याबरोबर.

बंड्या : म्हणजे जन्मठेपच.

सुधीर : मला म्हणायचं होतं–

बाबासाहेब : काही बोलू नको तुम्ही. एवढी निवडणूक होऊ द्या. मग लग्नच करून टाकतो बेबीचं आणि गुंडुरावाचं. मग तरी तुमच्या प्रेमावर पडदा पडंल का नाही ?

गुंडुराव : पडदा म्हणजे काय हो ? अंधारच की सगळा. अंधार अंधार.

(अंधार होतो)

प्रवेश दुसरा समाप्त.

* *

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्रा. क्र. २०२४२ नों. दि. ९।३।९४
वि. नाटक क्र. ..................

# अंक दुसरा

## प्रवेश तिसरा

(स्थळ : बाबासाहेबांचं घर. बेबी काहीतरी वाचत बसली आहे. वाचनात लक्ष नाही. मध्येच हातातल्या घड्याळाकडे पहाते. मध्येच घरात. पुन्हा वाचते. आतून बायजाबाई येतात. त्यांच्या हातात गजराचं घड्याळ आहे.)

बायजाबाई : किती वाजले ग बेबे ? बेबे, अग वाजले किती ?

बेबी : बारा !

बायजाबाई : बारा ! काय घड्याळ बंद पडलं काय ? आत्ता तर दहाचा भोंगा झाला.

बेबी : मग कशाला विचारलंस ? (बायजा भरतकामाचं सामान घेऊन येते.) साडेदहा वाजलेत. तरी हजारवेळा सांगितलं. इतकी वर्षे झाली, निदान घड्याळ तरी ओळखायला शीक.

बायजाबाई : अग, वा ! मग तुला इतकी शिकवली त्येचा आमाला उपेग काय ग?

बेबी : तुझ्यासारखी सगळी माणसं असती तर घड्याळांचा शोधसुद्धा लागला नसता.

बायजाबाई : आता तूबी लागलीस का बापासारखं भाषन द्यायला ? घड्याळ कळून आमाला का कुटं गाडी पकडाया जायचंय ? आता तुमी शिकून काय दिवे लावताय ते बगायचं. (बेबी गप्प) बरं, जा, जेवून घे जा ! (बेबी गप्प.) ए बेबी, जा. मी बाबांसाठी थांबते. त्यो फिरत असंल कुठंतरी बंधुभगिनी शोधत ! एऽऽ, काय म्हणतीय मी ?

बेबी : मला भूक नाही.

बायजाबाई लई कौतुक नको. भूक नसायला काय झालं ?

बेबी . जेवून काय करायचं ? इथंच बसायचं ना वाचत ?

बायजाबाई : आता माज्यावर कशापाई राग धरतीस ? का मी तुला घरात डांबून ठेवली ?

बेबी : मग तुला त्यांना बोलता येत नाही ?

बायजाबाई : म्या काय बोलनार ? तुमचं काय झालं समजलं तर पाहिजे का न्हाई? का ते वराडलं म्हून उगा वरडत सुटायचं ? तुला इचारलं तर तूबी तोंडात तंबाकू धरल्यावानी गप्प ? काय खरंच खाया लागलीस तंबाकू ?

बेबी : तंबाखू नको ! मला विष आणून दे, विष !

बायजाबाई : इख एकदम, म्हंजे नक्की काहीतरी भानगड हाय ! एकदम ईख खायला काय येडं का खुळं ? काय झालं सांग.

बेबी : काही नाही. तुला सांगितलं असेल बाबांनी.

बायजाबाई : आता, देवाच्यानं न्हाई सांगितलं तर ! मला फकस्त म्हनालं, बेबीला एकटं सोडायचं न्हाय. पाठवायचं झालं तर गुंड्याबरोबर पाठवायचं! तो मेला काळतोंड्या टपूनच बसलाय. त्येन्ला कायतरी संशय आलेला हाये. काय झालं सांग !

बेबी : अगं, मी नुसतं त्या पटवर्धनांकडे जाते. ते त्यांना आवडत नाही.

बायजाबाई : पटवर्धन ? ह्यो कोन पटवर्धन ?

बेबी : अगं, ते बाबांच्या सभेमध्ये बाहुल्यांचे खेळ करून दाखवतात, ते !

बायजाबाई : हाँ, ते भावलीवालं !

बेबी : भावलीवालं काय ? चांगलं पटवर्धन नाव आहे त्यांचं.

बायजाबाई : पटवर्धन ! चांगलं हाय. अगं, जरा त्यो डबा आन !

(बेबी पानाचा डबा आणून देते.)

बायजाबाई : (पान काढीत) पटवर्धन. म्हणजे जानवंवालं ?

बेबी : (रागानं) जानवंवालं काय ? ब्राह्मण म्हण ना.

बायजाबाई : त्येच ग. बामण हाय तर.

बेबी : आता तू पण माझी थट्टा–

बायजाबाई : न्हाय्, तसं न्हाय ! बस, बस ! हं, पटवर्धन ! पर त्ये काय शिकलेलं न्हाय म्हनन्यात !

बेबी : कुणी सांगितलं तुला ?

बायजाबाई : त्यो गुंडुराव म्हनत होता.

बेबी : (रागानं) त्याला काय माहीत ?

बायजाबाई : म्हंजे शिकलेला हाय. म्हंजे हुषार पन आसंल.

बेबी : मी जाते. (जाऊ लागते.)

बायजाबाई : मग बस, आता त्येच्यासाठी तू ईख खायला निघालीस ! जातीस कुठं ? बस.

बेबी : मी त्याच्यासाठी विष खायला निघाले नाही. पण मला घरात बसून कंटाळा आलाय. आता मी काय लहान आहे ? मला घरात डांबून ठेवता म्हणजे ?

बायजाबाई : तू लहान नाहीस. शिकलेली हायेस. त्यो बी शिकलेला हाय. म्हणून तर भीती ! बस खाली. (बेबी बसते.) ह्ये, नोकरी कुटं करत्यात ?

बेबी : कोण ?

बायजाबाई : ह्ये पटवर्धन !

बेबी : नोकरी नाही करत.

बायजाबाई : म्हंजे बेकार हाईत. नुसत्या भावल्या नाचवत्यात !

बेबी : शी: ! भावल्या नाचवतात काय ? ते फार मोठे व्हेन्ट्रीलोक्विस्ट आहेत.

बायजाबाई : असू देत, असू देत. पण म्हंजे काय असतं ते ?

बेबी : म्हणजे शब्दभ्रमकार. अग, अगदी अवघड कला असते ती. त्यांच्या तोडीचे शब्दभ्रमकार जगात फार थोडे आहेत.

बायजाबाई : कोण शोधाया जातंय म्हणा ! येळ कुणाला हाय ? तुज्या बाला वेळ नाही. त्यो बसलाय विलेक्शनमंदी डोकं खुपसून, पर म्या म्हनत होते, आपल्या तोलामोलाचा डाक्तर न्हाईतर विजीनियर, निदान चांगला पैसा अडका–

बेबी : मी त्या गुंडूशी लग्न करणार नाही.

बायजाबाई : कोण सांगतंय ? त्ये बाचं राहू दे. येवढं एका बाबीत म्या त्याचं ऐकणार नाही. त्या काळतोंड्याशी लगीन लावण्यापरीस मी माझी पोरगी हिरीत ढकलीन.

बेबी : हं, तू जर लवकर काही केलं नाहीस तर तीच वेळ येणार आहे. बाबा काही आपला हट्ट सोडायला तयार नाहीत.

बायजाबाई पर ह्ये पटवर्धन म्हंजे–

बेबी : त्यांचं काय ?

बायजाबाई : न्हाई, आता तुज्या कर्मात लिव्हलेलं असंल ते आम्हाला पुसता येतंय थोडंच ! त्ये पटवर्धन बामन हाय न्हाई का ? जाऊ दे, जातिपाती आता आमालाच मोडायला पायजेत.

बेबी : मग तू बोलशील बाबांशी ?

बायजाबाई : म्या नको गं बया ! आताच घर डोक्यावर घेऊन नाचत सुटतील, आणि त्या काळतोंड्याशी लगीन लावून मोकळं होतील. (पान खात.)

जरा दमानं घ्याया पाहिजे.

बेबी : मग मी जाऊ ?

बायजाबाई . कुटं जातीस ? जा अगोदर, आत जाऊन जेवून घे.

बेबी : (जात) पण मला भूक नाही. मी अर्ध्या तासात येते.

बायजाबाई . उगा घायकुतीला येऊ नगस. म्या तुजं काम कराया पाहिजे ना ? मग आधी जेवायला चल. (पान थुंकतात. बेबी स्वयंपाकघरात जाते. बेबीने टाकलेले पुस्तक जागेवर ठेवत असताना गुंड्या येतो.)

गुंडुराव काय प्रचंड झालं सबा ! मोजून दोनशे मानूस होतं बगा– पैशे न मोजता. (बायजाबाई न बोलता पानाचं आवरून ठेवतात. त्याच्याकडे बघून खोटं हसतात.)

गुंडुराव : त्ये बेबी कुटं बाहेर गेलं काय ? (बायजाबाई रागावून बघतात.) आता बाबासाहेब नक्की येणार बघा निवडून. (बायजाबाई पुन्हा हसतात.)

गुंडुराव : काकी, मी काय म्हणत होतो, आता सोडून सोडा हो राग ! सगळं कसं मंगळ होणार बघा ! आता ह्ये लग्नाचं तेवढं मनावर घ्या. एकदा लग्न होऊ द्या माझ्याशी ! मग असं ठेवतो तुम्हाला आरामात.

बायजाबाई . हूं.

गुंडुराव · तुमच्यासाठी स्पेशल गाडी ठेवतो अँबॅसिडर.

बायजाबाई : हूं.

गुंडुराव : मग त्याच्यात बसून करा की हो वाट्टेल तितक्या तीर्थयात्रा. पंढरपूर म्हणू नका, कोल्हापूर म्हणू नका, तिरुपती म्हणू नका, तुळजापूर म्हणू नका.

बायजाबाई : हूं. (नाही या अर्थी)

गुडुराव सगळी व्यवस्था झालीय बघा, काकी. तुमी फक्त हो म्हणा. मी काय म्हणतो, हे हुबळीनचं करू टाकू की लग्न. दणक्यात होऊ द्या हो लग्न ! सोनं बिनं भरपूर घेऊन टाकतो. आणि अगदी नाजूक वापरतो बघा– फुलासारखी म्हटलं तर कळेल तुम्हाला. तुम्ही नुसतं बसून रहा.

बायजाबाई · हूं.

गुंडुराव : हे लग्न झालं म्हणजे काका एकदम मंत्रीच की ! ऐका हो काकी, तुम्हाला कुठून कुठं नेऊन ठेवतो बगा. वर्साला एक पोरगं देतो की, हो काकी.

बायजाबाई : (अडकिता लागतो.) आयऽ

गुंडुराव : च् च् च् च् ते टोचलं काय ? अडकित्ता ?
बायजाबाई : हूं.
गुंडुराव : आत्ता काय करावं ? ज्ये इचारील ते नुसतं हूं म्हनता. अहो तोंड सैल सोडून बोला की वो काकी, घडाघडा.

(बायजाबाई हातानं थांबण्याची खूण करतात. बाहेर जातात आणि थोडया वेळात परत येतात.)

बायजाबाई : अहो, तोंडात पान होतं गुंडुराव, म्हणून बोलत नव्हते मी. चांगलं पान जमलं होतं त्येचा इस्कोट केलासा. आता सांगा, काय म्हनायचंय तुम्हाला ?
गुंडुराव : अरेच्चा ! म्हंजे मघापासून बोंबलतोय ते सगळं भिंतीसमोर का काय ?
बायजाबाई : हे बघा, कुनाला जरूर हाये, मला का तुम्हाला ?
गुंडुराव : मला !
बायजाबाई : मग पुन्हा बोला.
गुंडुराव : काकी, मला लगीन करायचं आहे. तुम्ही नुसतं 'हो' म्हणा की लगीन झालंच !
बायजाबाई त्याचं काय हाय गुंडुराव, माझं लगीन कधीच झालंय. मला पोरगी बी झाली हाये आणि आत्ता तुम्ही मला लग्नाची मागणी घालता ? काय खूळ लागलं की काय तुम्हाला ?
गुंडुराव : अहो ते कुठून कुठं नेताय हो ? आता एवढं मोठं इमारत सांभाळायचं म्हणजे अरिष्ट की हो ! मी म्हटलं ते बेबीच्या आणि माज्या लग्नाचं. तुम्ही फक्त हो म्हणा. टाकलीच बघा छापायला पत्रिका. सगळं पाठ केलंय बघा मंगलाष्टकं !
बायजाबाई · मंगलाष्टकं ? ती हो कशाला ?
गुंडुराव . अहो ते भटजी आयत्या वेळी आलं नाही, म्हणजे अडून नको राहायला. अंतरपाट म्हणू नका. मंगलाष्टकं म्हणूच नका. सगळं तयार. (मंगलाष्टकं म्हणतो) गंगा सिंधू सरस्वती...

(बेबी जेवता जेवता बाहेर येते. पुन्हा आत जाते.)

बायजाबाई . थांबा, थांबा आणि भटजीसारखाच बँडवाला ऐनवेळेला आला न्हाई तर ?

गुंडुराव : ते बँडचं काही अवघड नाही म्हणा. माज्या लग्नात मीच ब्यांड वाजवीन की हो. (तोंडापुढे बँडसारखी कागदाची सुरळी करून बँडवर गाणे वाजवतो)

(बाबासाहेब प्रवेश करतात.)

बाबासाहेब : आनंदाची बातमी. (हातातला तारेचा कागद उंच धरतात.)
बायजाबाई : बसा आता ब्यांड वाजवीत.
गुंडुराव : चांगली बातमी ? म्हणजे आमच्या लग्नाचं काय हो ?
बाबासाहेब : अहो गुंडुराव, आमच्या प्रचारसभेसाठी खुद्द पंतप्रधानांनी येण्याचं मान्य केलं आहे.
गुंडुराव : म्हणजे रामराव बोंबललं की हो ! बाबासाहेब टोणगे की जय. पेढे वाटा, पेढे !
बायजाबाई : हाँ वाटतीया. वाट बघा. तुमी चला जेवून घ्या.
बाबासाहेब : अगं, मग जेवन हायेच की ! आता पंतप्रधानांच्या भाषनाची तयारी— केवढी तयारी लागंल ! गुंडुराव, ही तार घ्या. पक्षाच्या कचेरीत आली. आता एकदम कामाला लागलं पाहिजे. आपल्या प्रदेशाध्यक्षकांकडे फोन करा. प्रेसला फोन करा. (गुंडू फोन करतो.)
बायजाबाई : (बाबासाहेबांना बाजूला घेऊन) तुमी जरा आत चला. मला बेबीबद्दल काहीतरी सांगायचंय.
बाबासाहेब : ते बेबीचं राहू दे बाजूला. अगं, पंतप्रधान येत्यात. त्येंच्या सभेची तयारी करू का हितं घरात डोकं घालून बसू ? (गुंडुरावला) काय, फोन लागतोय का ?
बायजाबाई : कायकाय गोष्टी येळेवर व्हायला पाहिजेत. मग काय झालं तर मला बोल लावू नगा.
बाबासाहेब : आता पयली विलेक्शन. मग समदं ! बेबीला म्हनावं, जरा कळ काढ !

(गुंडुराव फोन करायचं मध्ये सोडून दोघांच्या मध्ये येऊन ऐकत राहतो.)

गुंडुराव : त्ये काय म्हनतं हो ?
बायजाबाई : आला मेला तोंड खुपसायला ! जा, तुझं काम कर जा ! आता तुमी जेवाय येता का ?

बाबासाहेब . हां. येतो, जा.
गुंडुराव : त्ये काय म्हनतं होतं हो ?

(फोन वाजतो. बाबासाहेब फोन घेतात.)

बाबासाहेब : हॅलो. हां. मीच बोलतो आहे. नमस्कार ! काय ? (चेहरा पडतो.) आं ? पंतप्रधान येऊ शकत नाहीत ? मग कोण येणार ? गृहमंत्र्यांना पाठवणार ? बरं, या म्हणावं. पण हल्ली गृहमंत्री कोण आहे ? नाही, मी दोन दिवसांत पेपर वाचला नाही, म्हणून विचारतो. हल्ली रोज खाती बदलत्यात. बरं बरं. येऊ देत. गृहमंत्री येऊ देत. (फोन खाली ठेवतात. गुंडुरावला) गुंडुराव, आता निराश व्हायचं नाही. जोरदार तयारी झाली पाहिजे. अहो, पंतप्रधानांना येळ न्हाई. त्या पंजाबला चालल्यात. गृहमंत्री तर गृहमंत्री. (गुंडुराव निराश होतो. पुनः फोन वाजतो.)
गुंडुराव : (फोन घेऊन) कोण ? जवाहरलाल नेहरू ? (फोनवर हात ठेवून बाबासाहेबांना) जवाहरलाल नेहरू आहेत का म्हणून फोन आहे.
बाबासाहेब : नेहरू ? (आकाशाकडे बोट दाखवून) ते वर असतात.
गुंडुराव · (फोनवर) ते वरच्या मजल्यावर राहतात. नंबर होय ? फोनचा ? असं करा. आमच्या फोनच्या वरचा नंबर फिरवा म्हणजे तो वरच्या मजल्यावर जाईल.
बाबासाहेब (कपाळावर हात मारतात.)तुम्हाला काय करायचं आता खासदार ? अहो, जवाहरलाल नेहरू वर गेले म्हणजे स्वर्गवासी झाले. त्यांना कसा फोन येईल ? आणि आला तर इथं कशाला येईल ?
गुंडुराव : बरोबर. (फोनवर) अहो, नेहरूसाहेब स्वर्गवासी झाले. पेपर गिपर वाचतोस की नाही ? मग फोन कशाला केलास ?... हां. हां. तुम्हाला जवाहरलाल नेहरू मेडिकल स्टोअर्स पाहिजे ? रांग नंबर. आधी सांगायचं नाही का तसं ? नंबर चुकलं !
बाबासाहेब : खासदार. आता फोन घेऊ नका. अहो उद्या आमची प्रचंड मिरवणूक काढायची आहे. त्याची तयारी बियारी केली का न्हाई ?
गुंडुराव : आता तयारी म्हणजे जोरात की हो ! ह्ये बघा, असलं ५० हजार पोस्टर, १० हजार बॅनर, २०० जीपगाड्या, मोटारी, स्कूटर, रिक्षा, मायकली, टॅक्सीज् सगळं जय्यत तयारी आहे बघा. (मोठं पोस्टर दाखवतो. फोन वाजतो. गुंडुराव धावतो.)

बाबासाहेब : तुमी घेऊ नका. (स्वतः घेतात) हां, बाबासाहेब बोलतोय. काय झालं ? बरं ! (फोन ठेवतात)

गुंडुराव : काय हो ?

बाबासाहेब : गृहमंत्र्यांना वेळ नाही, राज्यमंत्र्यांना पाठवताएत. (गुंडु खचून खाली बसतो.) काही हरकत न्हाई. आता असं खचून निराश व्हायचं नाही बगा. ५० ट्रकची ऑर्डर द्या. उठा उठा.

गुंडुराव : पन ते राज्यमंत्रीला कोण बघनार हो ? त्ये आमचं बाप काय. तिकडं विड्या वळत बसलं काय ? ते विलेक्शनचं बोंबललं, तर आमचं पण बोंबललं की म्यारिज !

बाबासाहेब : (चिडून) का उगा गुडघ्याला बासिंग बांधून फिरताय? आता विलेक्शन होईपातूर पुन्हा जर बोलला म्यरिजचं तर सगळं कॅन्सल करून टाकीन.

गुंडुराव : हं, घातलं बगा तोंडाला कुलूप.

(पुन्हा फोन वाजतो)

बाबासाहेब : घ्या तो. (गुंडुराव तोंडाचं कुलूप काढल्याचा अभिनय करतो.)

गुंडुराव : कोण रे तो ? काय झालं ? ते राज्यमंत्रीचं पण बोंबललं काय ? मग कोण येणार ? राज्यउपमंत्रीचं सेक्रेटरी ?

बाबासाहेब : (फोन घेऊन) या सेक्रेटरीचा पट्टेवाला येत असलं तर बगा. (रडत) आनि ह्ये बगा, त्या पट्टेवाल्याला बी येळ नसंल, तर दोन हात नि दोन पायवालं भावलं पाठवलं तरी सभा होनार ! (फोन ठेवतात आणि रडत बसतात.)

गुंडुराव : काका, हे बगा (पोष्टर दाखवतो.) आत्ता मिरवणूक काढतो. बाबा-साहेब की जय ! (दोघांच्याही अंगात निवडणूक संचारते. हातात पोष्टर घेऊन नाचतात. फ्लोरा फौंटनवरच्या शेतकरी– कामगाराच्या पुतळ्याप्रमाणे स्थिर होतात. अंधार.)

(अंक दुसरा समाप्त.)

* *

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

(सुधीरचं घर. बेबी हातात कागद घेऊन टी. व्ही. वरील बातम्या वाचत आहे. सुधीर आत आहे बातम्यांचे पार्श्वसंगीत.)

बेबी : आजच्या काही ठळक बातम्या. आज पंतप्रधानांनी एक अत्यंत महत्त्वाची घोषणा केली. त्या म्हणाल्या–(आत असलेल्या सुधीरला) ए ऽऽ झालं की नाही तुझं ?

सुधीर : (आतून) आलो, आलो. तू जरा प्रियाशी बोलत बस.

बेबी : (संशयानं) प्रिया काय ? कुणाची प्रिया ?

सुधीर : अगं ती शेजारची मुलगी– प्रिया. लहान आहे, पाच वर्षांची.

बेबी : या घोषणेचा देशावर फार दूरगामी परिणाम होईल याबद्दल सर्वांचं एकदम झालं. मुंबई शहरात उद्यापासून (सुधीरला) 'ए, मला जास्त वेळ नाही हं' असं म्युनिसिपल कमिशनरनी सांगितलं. तिसरी महत्त्वाची घटना म्हणजे औरंगाबाद इथं झालेल्या भावगीत स्पर्धेत–

सुधीर : (खुर्चीवर येऊन बसतो) हां, आता बोल ?

बेबी : दोन लोक ठार आणि १५ लोक जखमी झाले.

सुधीर : असं ? काही कल्पना नाही बुवा.

बेबी : तू इतका वेळ आत काय करत होतास ? दार उघडं ठेवून ?

सुधीर : त्या मांजरानं वाट लावली सगळी. उलथापालथ केली. पण प्रिया होती इथे ती गेली वाटतं ? ते भावगीत स्पर्धेचं काय म्हणत होतीस ?

बेबी : अरे टी. व्ही. वरच्या बातम्यांची प्रॅक्टीस करत होते. मला टी. व्ही. वर मुलाखतीसाठी बोलावलं आहे.

सुधीर : टी. व्ही. वरच्या बातम्या द्यायच्या आहेत ना ? थांब एक मिनिट !

बेबी : हो.

(टी. व्ही. चा कटआऊट आणतो.)

बेबी : हे काय ?

सुधीर : ही टी. व्ही.च्या बातम्यांची तयारी. थांब. बातम्यांसाठी आणखी एक वस्तू लागेल. (माशी मारण्याचं प्लॅस्टिकचं बॅट तिच्या हाती देतो.)

बेबी : (ते टाकून) मला नाही लागणार ते. (हातातला कागद सज्ज करून) सुरू करू ?

सुधीर : थांब. (दोऱ्याला बांधलेली प्लॅस्टिकची माशी आणतो) अगं माशी-शिवाय बातम्या होऊच शकत नाहीत.

बेबी . आता सविस्तर बातम्या ऐका. आज पंतप्रधान (माशी नाकावर बसते).. असंही पंतप्रधानांनी सांगितलं. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी यावर (माशीला मारते) अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. मुंबईचे पोलिस कमिशनर– माफ करा– म्युनिसिपल कमिशनर यांनी सांगितलं (माशी चावते) आई ग ! थांब, मेले. (माशीचा पाठलाग करते.) माफ करा, सांगितलं की उद्यापासून मुंबईचा पाणीपुरवठा (माशीला मारते.) होईल. (दमून बसते.) मला नाही जमत या माशीच्या वैतागातून बातम्या सांगायचं.

सुधीर : अग, ही खोटी, प्लॅस्टिकची माशी होती, तर एवढी दमलीस, टी.व्ही. वर तर खऱ्या माशा असतात. आणि बरं का, बातम्या सांगायच्या तर त्यात मूड आणला पाहिजे.

बेबी : मूड ?

सुधीर : हो. म्हणजे भारतानं इंग्लंडविरुद्धचा विश्वचषक सामना जिंकला ही बातमी सांगताना तू आनंदानं नाचायला पाहिजेस !

बेबी : हॉं ! आता कळलं! आता पहा हं कसा मूड आणते ते ! (बेबी हातवारे करते. राणा भीमदेवी थाटानं, रागानं मुठी आवळून) कोणत्याही परिस्थितीत–

सुधीर : वा: वा: वा : !

बेबी : कोणत्याही परिस्थितीत ! अमेरिकन ओलिसांना आम्ही सोडणार नाही असं खोमेनी यांनी आज तेहरानमध्ये सांगितलं !

सुधीर : वा: क्या बात है !

बेबी : (एकदम रडक्या सुरात हुंदके देत) काय सांगू तुम्हाला ? कपाळ ? अहो, घात की हो झाला ! कुटुंबनियोजन खात्याचे असिस्टंट सेक्रेटरी श्री. बा. रा. दशपुत्रे–

बाहुली : बारा का ?
बेबी : आज संध्याकाळी सहा वाजता निधन की हो पावले.
सुधीर : (रडक्या सुरात) वा वा वा !
बेबी : त्यांच्या मागे त्यांचे नऊ मुलगे आणि सात मुली असून त्यांच्या मिसेसची पुढील डिलिव्हरीची तारीख डॉक्टरांनी येत्या महिन्याची सात दिली आहे. या अपत्यप्राप्तीच्या वेळी दशपुत्रे समक्ष हजर राहू शकणार नाहीत. (स्फुंदून रडते. एकदम आनंदाने हसत) वेस्ट इंडीज विरुद्ध भारत हा विश्वचषक क्रिकेट सामना भारतानं जिंकला असून त्यात संदीप पाटील याने (माशी मारण्याचे स्वॅप क्रिकेट बॅटसारखे धरून माशांना मारीत) लागोपाठ आणि दोन षटकार मारले.
सुधीर : वा: वा: कॉन्ग्रॅच्युलेशन्स (हसतो.)
बेबी : (गंभीरपणे) हसता काय? शरम नाही वाटत ? पंजाबमधल्या अत्याचारात पस्तीस लोक ठार आणि साठ लोक जखमी झाले आहेत. वातावरण तंग आहे. (हातातले कागद भिरकावून आनंदाने) चला, बातम्या संपल्या, पिडा गेली !
सुधीर : छान ! अशा बातम्या सांगितल्या पाहिजेत. म्हणजे त्यात नाटच निर्माण होईल.
बेबी : (वेडावीत) ए हॅं हे नाटय काय निर्माण होईल ? अशा बातम्या जर का मी देऊ लागल्ये, तर टी. व्ही.च्या दारातसुद्धा मला कोणी उभं करणार नाही. टी. व्ही.ला की नाही एवढं म्हणजे एवढंसुद्धा काही चांगलं खपत नाही ! माझी बातम्यांची तालीम घेणार ना ?
सुधीर : पण मी कुठं तुझ्या बातम्यांची तालीम घेत होतो ? मी माझ्या गजऱ्याची तालीम करीत होतो !
बेबी : ए, मस्करी करू नकोस हं. मी तुला आधीच सांगितलं होतं, की मला टी. व्ही.वर मुलाखतीसाठी बोलावणं आलंय म्हणून. माझी तालीम घ्यायचं तू कबूल केलं होतंस.
सुधीर : अग, मला टी. व्ही.वर गजरा सादर करायचं आमंत्रण आलं आहे. तो गजरा टी. व्ही.च्या कार्यक्रमावरच आधारलेला असावा अशी माझी कल्पना आहे. त्यात तुझा हा बातम्यांचा सीन टाकू या ना.
बेबी : (रुसव्यानं) मग मला कशाला बोलावतोस ? तुझ्या बाहुल्यांना घेऊनच हा गजरा सादर कर ना.
विचारे : तुम्ही आलात ना ? मग आमचा चान्स गेला !

सुधीर : बाहुल्या तर मुख्य. असे मस्त आयटेम जुळवलेत बघ त्यांचे.

बेबी : पण मला नाही सांगितलंस ते ?

सुधीर : अग, परवाच तर ठरलं. दोन-तीन दिवस पत्ता कुठे आहे तुझा ? तू बाबासाहेबांच्या निवडणुकीत गुंतलेली. थांब, टी. व्ही. आणतो. (आत जातो. टी. व्ही.चा कट आऊट आणतो.)

बेबी : पण लवकर हं. मला जास्त वेळ नाही. (टी. व्ही.च्या कट आऊट-मध्ये जाऊन बातम्यांची तालीम करीत) नमस्ते.

सुधीर : अग, थांब थांब. आधी माझ्या गजऱ्याची तालीम.

बेबी : आधी माझ्या बातम्यांची ट्रायल.

सुधीर : नाही, आधी गजरा.

बेबी : नाही, आधी बातम्या.

सुधीर : नाही, गजरा.

बेबी : नाही, बातम्या.

सुधीर : बास कर. बास कर. आता तुला उशीर नाही का होत ?

बेबी : आईला सांगून आलीये.

सुधीर : म्हणजे तू आईशी बोललीस सगळं ?

बेबी : अंहं.

सुधीर : आई बाबासाहेबांशी बोलली ?

बेबी : अंहं. अजून नाही. बाबासाहेबांना वेळ कुठं आहे ? ते इलेक्शनमध्ये. उद्या इलेक्शन !

सुधीर : अग, आता चोरून मारून असं किती काळ भेटायचं !

बंड्या : (गाणं म्हणतो) कुठवर चोरून फिरायचं ?
औंदा लगीन करायचं !

बेबी : इश्श ! हा बंड्या मेला फारच वात्रट आहे हो.

बंड्या : तर काय ? खरं बोलतो !

सुधीर : पण काय ग, निवडणुकीचा निकाल काय लागेल असं तुला वाटतं ?

बेबी : माझा विश्वास आहे की विजयाची माळ बाबांच्याच गळ्यात पडणार !

ठकी : पण तुमची माळ कुणाच्या गळ्यात पडणार ?

बेबी : ही पण आता यांच्यासारखीच वात्रट बोलायला लागली हं.

सुधीर : (बेबीच्या हातात एक कागद देत) हे घे. थांब जरा. (टी. व्ही. कट आऊटकडे जातो.)

बेबी : हे काय ?

सुधीर : रूपरेषा.

बेबी : रूपरेषा ? कसली ?
सुधीर : साप्ताहिकी. तू वाच. मी सादर करतो.
बेबी : करू सुरुवात ?
सुधीर : हो. पण भक्तीभावाने हं. टेन सेकंडस् टु गो, फाईव्ह, फोर, थ्री, टू, वन.
जाहिरात : (बेबीच्या आवाजात गाणे ऐकू येते.)
ससा तु ससा की कापूस जसा त्याने कासवाशी पैज लाविली
वेगे वेगे धावू नि डोंगरावर जाऊ ही शर्यत रे आपुली.
ससा : झोपलो म्हणून पैज हरलो हे खरे ! पण का झोपलो ? कारण कासवानं–
कासव : म्हणजे कासव छाप अगरबत्ती लावली म्हणून !
ससा : तुम्हीसुद्धा लावा.
कासव : कासव छाप अगरबत्ती.
ससा : आणि सुखानं झोपा.

(साप्ताहिकीचे पार्श्वसंगीत सुरू होते आणि टी. व्ही.वर 'साप्ताहिकी' हा फलक येतो.)

बेबी : आता आम्ही सुरू करीत आहोत येत्या आठवड्यातील कार्यक्रमांची रूपरेषा. सोमवारी कोणताही ठळक कार्यक्रम होणार नाही. सर्व कार्यक्रम पुसट पुसट दिसतील. मंगळवारी ६ वाजून ३२ मिनिटांनी किलबिल (पक्ष्यांचे आवाज) त्यात 'आमची पाचवी' हा कार्यक्रम सादर करतील पन्नाशीच्या पुढची बाळं. या कार्यक्रमात भाग घेतील सर्वश्री बाळ कोल्हटकर, बाळ कुडतरकर, बाळ धुरी आणि पुरुषोत्तम बाळ. बुधवारी ७ वाजून ४०॥ मिनिटांनी 'रुचकर माझं स्वयंपाकघर' या कार्यक्रमात पाककुशल गृहिणी आवडाबाई 'सुरळीच्या वड्यां'ची कृती सादर करतील.
आवडाबाई : त्या कालवलेल्या पीठात तिखट, मीठ, हळद, कोथिंबीर घालून एक-सारखं ढवळत रहायचं आणि ते गरम पिठलं भरभर भरभर भरभर पालथ्या ताटावर पसरायचं. मी चांदीचं ताट घेते. आमच्याकडे खूप आहेत चांदीची ताटं– सासूबाईंच्या वेळची. तुमच्याकडे चांदीची ताटं नाहीत ना ? मग सुरळीच्या वड्या सुरळीत जमणार नाहीत. कड-कडून भूक लागली तर हा पदार्थ चवीला चांगला लागतो. नाहीतर खाववत नाही.
बेबी : बुधवारी रात्री १० वाजून ५० मिनिटांनी 'पातळाशी जडले नाते' माफ करा– 'पाताळाशी जमले नाते' हा, विज्ञानावर आधारित

कार्यक्रम होईल. त्यापूर्वी राष्ट्रीय कार्यक्रम होईल. तेव्हा ९ ते १०॥ टी. व्ही. बंद केला तरी चालेल. गुरुवारी रात्री ८ वाजून १० मिनिटांनी ' मुलखावेगळी जनावरं ' या कार्यक्रमात सुप्रसिद्ध निळचा कोल्ह्याची मुलाखत. ही घेईल काळा ससा.

कोल्हा : लहानपणापासूनच मला हौदात पडायचा छंद होता.

ससा : पण या निळ्या रंगामुळे रानात वावरताना तुमची कुचंबणा तर होत नाही ना ?

कोल्हा : छे: छे: ! उलट या जगावेगळ्या रंगाचा मला अभिमान वाटतो.

ससा : पण तुम्ही या छंदाकडे कसे काय वळलात ?

कोल्हा : (मान फिरवून) असा वळलो !

बेबी : गुरुवारी रात्री ९ वाजून १० मिनिटांनी ' फूल खिले है गुलशन 'मध्ये सुप्रसिद्ध सिनेस्टार अर्धवटराव यांची मुलाखत घेतील तरन्नुम. याबरोबरच त्यांच्या आगामी ' महान ' या चित्रपटातील लहान दृश्यं दाखवण्यात येतील.

अर्धवटराव : तरन्नुम, मै तुम्हे ' जी ' नही बोलूंगा. क्यों की तुम मेरी छोटी बहन जैसी हो.

तरन्नुम : हां दादा, बिलकुल सही.

अर्धवटराव : शूटिंग के पहिले दिन डरके मै काप रहा था. क्यों की मेरे सामने एक बहुतही सुंदर लडकी खडी थी. मैने अमिताभजी से पूछा ये कौन है ? वे बोले ' अबे ये ब्यूटी क्वीन झीनत अमान है. ' लेकीन मै उसे पहचान नही सका ! क्योंकी उसने कपडे पहने थें.

बेबी : एक विशेष सूचना. गुरुवारी रात्री राष्ट्राच्या नावाने संदेश देतील श्रीयुत गडबडसिंग. शुक्रवार. शुक्रवारी सायंकाळी ७ वाजून ३२ मिनिटांनी आम्ही सादर करीत आहोत आमचा सर्वाधिक लोकप्रिय कार्यक्रम– (टी. व्ही. वर फलक येतो– ' रुकावट ') रात्री ९ वाजून १५ मिनिटांनी चित्रपट गीतांवर आधारित कार्यक्रम– वायागीत. यातील चित्रपट आहेत– दो आँखे, बारा हात, एक दुजे के लिये, चारशेवीस.

(साखळीला बांधलेला कुत्रा व कुत्री टी. व्ही. वर दिसतात.)

गाणे : तेरे मेरे बीचमे कैसा है ये बंधन अंजाना, मैने नही जानाऽऽ ना

(सर्व बाहुल्या सुधीरला उद्देशून गाणे म्हणतात.)

गाणे : ऐ मालिक तेरे बंदे हम
हाथ तेरे हमारे कदम
प्यार करते रहे दिल तडपते रहे
बात करते हुए निकले दम

बेबी : फर्स्टक्लास झाले आहेत कार्यक्रम. आणखी कुठले कुठले आहेत ?
सुधीर : हं, आता नाही वाटतं उशीर होत तुला ?
बेबी : आईला सांगून आले आहे, म्हटलं.
सुधीर : म्हणजे ? आईला बोललीस तू ?
बेबी : हो.
सुधीर : आणि बाबासाहेबांना ?
बेबी : अजून नाही. त्यांना वेळ कुठे आहे ? ते तर निवडणुकीत गुंतलेले-
उद्या तर मतदान.
सुधीर : ते जाऊ दे. पण आपण आता असं चोरून मारून किती वेळ भेटायचं ?
ठकी : (गाते) चोरून कुठवर फिरायचं !
औन्दा लगीन करायचं !
बेबी : इश्श ! ही तुमची ठकी अगदी चावट बोलते !
सुधीर : ए ऽऽ पण निवडणुकीचा निकाल काय लागेल असं तुला वाटतं ?
विचारे : तो काही का लागेना; पण तुमचा निकाल काय लागणार ?
बेबी : इश्श ! तुमच्या सगळ्या बाहुल्या अगदी चावट आहेत हं.
सुधीर : बेबी, तुला फार दिवस विचारीन म्हणत होतो-
बेबी : काय ?
सुधीर : मला विचारायचं होतं-
बाहुल्या : करा धाडस-
प्यार करने का फल आज नही तो कल.
सुधीर : मला असं म्हणायचं होतं, की तू माझ्याशी-
कावळीण : काव ऽ व का ऽ ऽ व का ऽ व.
बेबी : (घाबरून) आता कोण आलं आणखी ?
सुधीर : घाबरू नकोस गं. आज रविवार. तो पेपरवाला आला असेल महिन्याचा
हिशोब घ्यायला.
बेबी : पण हा सगळा पसारा...

सुधीर : (आत जाताना) तू जरा आवरून ठेव. मी आलोच. (जातो. दरवाज्यावर घंटा वाजते.)

बेबी : कोण आहे ?

सुधीर : (आतून) आलो आलो.

(बेबी दार उघडते. गुंडुराव येतो. बेबी चकित होते. गुंडुरावांच्या गळ्यात पिशवी आहे.)

सुधीर : (आतूनच) कोण आहे ?

बेबी : गुंडुराव आले आहेत. (सुधीर बाहेर येतो. गुंडुरावाला) गुंडुराव, तुम्ही बाबांच्या बरोबर घरी नाही गेलात ?

गुंडुराव : कसं चालेल हो जाऊन ?

सुधीर : अहो पण तुमचं काम—

गुंडुराव : आमचं खरं काम इथचं !

बेबी : हे बघा गुंडुराव, मी आईला सांगून आले होते. अहो यांचे पैसे द्यायचे होते ना कार्यक्रमाचे.

गुंडुराव : इतकं बिलाचं घाई सुटलं काय ? आम्ही कुटं पळून जातो की काय ? ए बेबी, ते बाबासाहेब हजार वेळा सांगून थकलं की आता आपलं लगीन होणार ! तरी तुझं आपलं जाणं येणं चालूच की ! अगं हे कसलं माणूस गं ? आपलं लेव्हल काय ? ह्येचं लेव्हल काय ? एक बिल तुंबलं तर प्राण जातंय याचं.

बेबी : हे बघा, त्यांनी पैसे मागितले नव्हते. तुमचा काहीतरी गैरसमज होतोय.

सुधीर : अहो बेबीराजे, तुमचं डोकं वगैरे काही दुखत नाही का ?

बेबी . (कपाळाला हात लावून) डोकं ? डोकं ! खरंच की ! आई गं ! माझं डोकं फार दुखायला लागलं की हो, गुंडुराव !

गुंडुराव : डोकं ? सबंध ? मग आता काय पाहिजे ते सांगून द्या की !

बेबी : मला ? लिंबू आणा हो !

गुंडुराव लिंबू ? (लिंबू काढतो.) हे घे लिंबू.

बेबी : पण ॲस्पिरिन नाही आणलंत बाहेर मार्केटमध्ये जाऊन—

गुंडुराव : ॲस्पिरिन, ॲनॅसिन, कोडोपायरिन (पिशवीतून पुड्या काढीत) काय वाट्टेल ते घे.

सुधीर : पण खासदारसाहेब, तिला मोसंबी हवी होती, क्रॉफर्ड मार्केटमधली !

गुंडुराव : मोसंबी ? (मोसंबी काढतो) ही घ्या मोसंबी. फळ म्हणू नका,

औषध म्हणू नका, वट्ट सगळ्या गोष्टी आहेत बघा याच्यात. जगातल्या वाट्टेल त्या रोगावरचं औषध आहे, पण आता बाहेर जायचं नाव काढायचं नाही बघा. अहो, मला काय हुंब समजला काय तुम्ही ?

सुधीर-बेबी : नाही, नाही.

बंड्या : महाहुंब आहात.

गुंडुराव : (रागाने) काय ? कोण बोललं ते ?

सुधीर : अहो, हा बंड्या बोलला. ह्याला कळतं हो ? लोक बोलतात ते हा ऐकतो आणि तेच बोलतो झालं !

गुंडुराव : ते वाटेल ते म्हणा. आम्हाला समजतंय, पण आता बेबीला हितं ठेवत नाही. घेऊन जातो बघा घरी.

बेबी : अहो गुंडुराव, पण घरी काय काम आहे ते तर सांगाल की नाही ?

गुंडुराव : अग घरी काम असलं काय, नसलं काय ? पण हितं भलतं काम निघालं तर अरिष्ट की ! (बाबासाहेबांच्या मोटारीचा हॉर्न वाजतो.) अरे, हे स्वतःच आलं की बाबासाहेब ! बेबी, आता घरी चलायचं बरं का ! चला, निघा.

बेबी : येते येते. बरं मिस्टर पटवर्धन, पुढच्या मीटिंगची तारीख लक्षात आहे ना ?

गुंडुराव : त्ये मीटिंग. मीटिंग सगळं संपल ! निगायचं आता (बेबी जाते.) आणि आवो भावलीवाले, तुम्हाला शेवटचं सांगून सोडतो. ह्ये बेबी पुन्हा हितं दिसलं तर तुमचं काही धड रहात नाही.

सुधीर : अहो पण ती स्वत: इथे आली तर ?

गुंडुराव : तर तिला बाहेर काढायचं इकडून ! ते पानवाला पुढची सगळी व्यवस्था करतंय. ते इलेक्शन–गिलेक्शन सगळं संपलं ! पुन्हा जर आमच्या भानगडीत पडलं...

बाहुल्या चले ए फूट, ए काळतोंड्या, आता जातोस की नाही इथून ?

(गुंडू एक बाहुली खेचतो व मोडून जमिनीवर टाकतो.)

गुंडुराव : हे असं हाल होतं ! समजलं काय ?

(सुधीर बाहुलीजवळ येतो. मोडलेली बाहुली उचलून जवळ घेतो. हळूहळू अंधार.)

* *

# अंक तिसरा

## प्रवेश दुसरा

(बाबासाहेबांचे घर. बायजाबाई रेडिओवर निवडणूक निकाल ऐकत आहेत. फोन वाजतो.)

बायजाबाई : (फोन घेऊन) कोन ? बेबी का ? ऑ ! बोल बोल. अगं जरा मोठ्यानं बोल. ऐकू येत न्हाई. कुठून फोन करतीयेस ? व्हय पर बेबे, अग इतका वेळ मैत्रिणीकडे ? व्हय. फोन आला व्हता. मतमोजणी चालू हाय.

(फोन ठेवतात. गुंडुराव आनंदानं नाचतच येतो.)

गुंडुराव : बेबी बेबी, काका आलं निवडून. मंडोळ्या काढा. हार काढा.

बायजाबाई . मंडोळ्या ? साहेब दुसरं लगीन करत्यात का काय ?

गुंडुराव : अहो काकी, मंडोळ्या मला नि हार काकान्ला. काकांनी मला शब्द दिला आहे तसा. म्हणाले, खासदार, आधी लगीन विलेक्शनचं आणि मग तुमचं.

बायजाबाई : अहो, पण अजून मतमोजणी चालू आहे. आधीच (रेडिओ लावते.) कशाला कालवा करताय ? गुडघ्याला बाशिंग बांधून ?

गुंडुराव : आता विलेक्शनची काळजीच सोडा हो, काकी ! ते आता निवडून आलं की, आम्हाला आधी कळतं. नंतर रेडिओवर डिक्लेअर होतं ! (रेडिओ लावतो. फोन) बाबासाहेबांचा फोन. (रेडिओ बंद करीत) काँग्रॅच्युलेशन्स काकी, काका आधी घरी येतंय मिरवणुकीचं तयारी करायला. आता काकी, आधी बेबी कुटं गेली ? काका हितं येतंय मिरवणुकीची तयारी करायला, कपडं बिपडं बदलायला, अन बेबी कुटं गेलं ?

बायजाबाई : बेबी मैत्रिणीकडे गेलीय. ती घरात नाही.

गुंडुराव : आता हे काय अरिष्ट हो ? या आनंदाच्या टायमाला माज्याजवळ उभं रहायचं सोडून, ते मैत्रिणीकडे कशाला गेलंय हो ?

बायजाबाई : अहो गुंडुराव, पण तुम्हाला काय करायच्या नसत्या पंचायती ? बेबी हिकडं गेलीय का तिकडं गेलीय ती ?

गुंडुराव : हे काय बोलता हो काकी ? सीतेची चौकशी रामानं करायची नाही, तर काय बिभीषणानं काय हो ?

बायजाबाई : (उपहासाने) तुम्ही राम ? (कपाळाला हात लावून) राम राम !

गुंडुराव : आता काका निवडून आल्यावर आम्हाला राम राम करता काय हो, काकी ? हां, ते चालायचं न्हाई. वरती दिल्लीला फोन करून विलेक्शन कॅन्सल करून टाकीन बघा ! माझ्या बापची पॉवर तुम्हाला म्हाईत नाही. (फोन करतो) लायटनिंग कॉल. दिल्ली. लायटनिंग. बाबासाहेबांच्या घरचं फोन आहे. बाबासाहेब माहिती नाही– आता निवडून आलं ते हो, (बायजाबाईंना) बेबीच्या लग्नाला हो म्हणा, नाहीतर फोनवर सगळं इलेक्शन कॅन्सल करतो.

बायजाबाई : अरे जा रे कॅन्सल करणाऱ्या ! तुझ्या आईबाबाचं लगीन कॅन्सल कर जा !

गुंडुराव : काकी... बाचं नाव काडायचं काम न्हाई. आधी बेबीला आणा मंडोळ्या बांधून, (शड्डू मारून) हा पठ्ठ्या तयार आहे तिला हुबळीला न्यायला.

बायजाबाई : माज्या पोरीला हात तरी लावून बघ. न्हाई तुज्या एका तोंडाची चार तोंडं केली, तर नाव बदलून देईन.

गुंडुराव : तुमी कशाला नाव बदलता हो, काकी ? मी हाय ना, हितं बेबीचं नाव बदलायला. लगीन झाल्यावर हिचं नाव शोषम्मा गुंडुराव खमेलहट्टी असं होणारच हाय की हो.

बायजाबाई : हे बघा खासदार, तुम्ही विलेक्शनला मदत केली असंल तर साहेबांच्याकडनं पाच दहा हजार रुपये घ्या, नाहीतर आणखी काय बक्षीस घ्या. या घरात माझा अधिकार हाय.

गुंडुराव : (रागानं) निवडून आलेल्या काकांनी मला शब्द दिलंय् त्यात काही बदल होत नाही बगा. (दिल्लीला डायरेक्ट फोन करतो. फोनवर रडत) बाबा... टोणगे काका आलं हो निवडून. नाही नाही. त्याबद्दल रडत नाही मी. बाबा, काकांचं विलेक्शन रद्द करा की हो. त्यान्ला मंत्रिमंडळाच्या लिस्टात घेऊ नका. दिल्ली– आण्णा (कानडीत

बोलतो. बाहेर बाबासाहेबांचा जयजयकार) ते बाबासाहेब आलं वाटतं !

(बायजाबाई एकदम फोन बंद करते आणि गुंडुरावला फोनपासून लांब खेचते.)

बायजाबाई आता व्हा भायेर आणि पब्लिक फोनवरनं काय शंख करायचा तो करा. (आनंदानं) काय ? बाबासाहेब आले ? (नमस्कार करीत) देवी अंबाबाई, मी बोललेला नवस फेडीन ग बाई तुझा. (फोन ठेवते.)

गुंडुराव . देवीचा नवस फेडणार ? आणि आमचं कोण फेडणार हो नवस ?

(बाहेरून ' बाबासाहेब की जय ' च्या घोषणा.)

बायजाबाई हे साहेब आले बघा. आता काय सांगायचं ते त्यानाच सांगा. (घाई-घाईनं आत जाते. गुंडुराव फोनकडे जाऊन फोन फिरवतो तोच ' बाबासाहेब की जय 'ची घोषणा. फोन खाली ठेवतो. बायजाबाई आतून आरती आणतात. बाबासाहेब गळ्यात हार घालून हसत प्रवेश करतात. बायजाबाई ओवाळतात. आत जातात.)

गुंडुराव : (हस्तांदोलन करून) काँग्रॅच्युलेशन्स की हो, काका ! मला म्हाईतच होतं, तुम्ही नक्की निवडून येणार म्हणून ! आता काका, जनतेची कामं करायला लगेच सुरुवात करा. येळ आहे का ? (फोन वाजतो.)

बाबासाहेब : खासदार, आता मिरवणूक निघणार आहे. त्याच्याआधी मी आत जाऊन देवाला नमस्कार करून येतो. मग कपडे बदलून मिरवणुकीला जाऊ या.

गुंडुराव : काका, तुम्ही निवडून आलं ना हो ? मग आता काय करायचं हो कपडं-बिपडं.

बाबासाहेब : म्हणजे ?

गुंडुराव : ह्ये चांगलं आहेत, कशाला बदलता म्हणतो मी. पण आधी जनतेची कामं करा की हो.

(फोन वाजतो. बाबासाहेब फोन घेतात.)

बाबासाहेब : (फोनवर) बोला. जगतापसाहेब का ? बोल, बोल म्हणता निवडून आलो. तुम्ही किती मतांनी निवडून आलात ? असं, असं. मी तेरा

हजार मतांनी आलो... थँक यू. (फोन ठेवतात.)

गुंडुराव : ते जनतेची कामं–

बाबासाहेब : अहो, आत्ता आमी निवडून आलो. पुढचे सहा महिने सत्कार होणार आमचे. मग बघू सवडीनं जनतेच्या कामांचं. पण कसली जनतेची कामं ?

गुंडुराव : माजं लगीन करा की हो, बेबीबरोबर.

बाबासाहेब : अहो, किती घाई करता ? अशा महत्त्वाच्या विषयात जरा दम धरायला पाहिजे. वेळ काय, प्रसंग काय ? इराणनं इराकवर हल्ला केलाय. तुम्हाला कल्पना आहे काय ? मला आहे.

गुंडुराव : अहो, दम धरून आमचं श्वास बंद व्हायची वेळ आली, की हो, काका.

बाबासाहेब : हे बघा, मी तुम्हाला शब्द दिलाय् ना ? मग मी तो पुरा करणार. तुम्ही आधी मिरवणुकीचं बघा.

(फोनची घंटा वाजते. गुंडुराव फोन घेतो.)

गुंडुराव : (फोनवर) कोण ? कोण देव ? अहो, हितं जनतेच्या कामाचं चाललंय. देवबिव काय म्हाईत न्हाई–

बाबासाहेब : अहो, हिकडं आणा तो फोन. देव म्हणजे मोठे सेक्रेटरी आहेत मंत्रालयात. (फोन घेऊन फोनवर बोलतात) नमस्कार देवसाहेब. मी बाबासाहेबच बोलतो आहे. थँक यू. थँक यू. काय म्हणता साहेब ? खरं ? तुमच्या तोंडात साखर पडू दे. (फोनवर हात ठेवून बायजाबाईंना) अहो, पेढे वाटा, पेढे. नव्या मंत्रिमंडळाच्या लिस्टात आमचं नाव आहे. (फोनवर) थँक यू देवसाहेब. काय म्हणता ? तुमच्या मेव्हणीला सरकारी फ्लॅट पायजे ? देऊ की, देऊ. (फोन ठेवतात.)

गुंडुराव : (बाबासाहेबांचे पाय दाबत) काका, तुम्ही मंत्री झालात, आता माझं लगीन–

बाबासाहेब : करू या हो. माझा शब्द म्हणजं शब्द.

गुंडुराव : पण ते काकी कसं करतंय बघा की हो.

बायजाबाई : मी या गुंडुरावाला–

बाबासाहेब : अहो, आता मी मंत्री आहे म्हटलं. माझा शब्द अखेरचा. या गुंडुरावाचं बेबीबरोबर लगीन करायचं आहे. तुम्ही 'हो' म्हणा.

बायजाबाई : (नाइलाजानं) व्हय.

बाबासाहेब : चला तर आता.

(बाबासाहेब व बायजाबाई जातात. फोनची घंटा वाजते.)

गंडुराव : (फोन घेऊन) हां, हां, मी गुंड्राव बोलतो आहे. (आश्चर्यानं) काय पानवाले ? बेबी गेलं त्या भावलीवाल्याकडं ? थांबा, थांबा. येवढी मिरवणूक रस्त्याला लावून आलोच.

(बाहेर जयजयकार व वाजंत्री)

(अंधार– प्रवेश समाप्त)

* *

# अंक तिसरा

## प्रवेश तिसरा

(सुधीरचं घर. सुधीर तीन खुर्च्या आणून ठेवतो. सदा विचारे आणि बंड्या 'चलो लास्ट डे, लास्ट डे' असे गडबडीने म्हणत आहेत.)

सदा : काय, तयारी झाली का ? तयारी ?
सुधीर : तीच चाललीय ! दिसतेय ना ?
बंड्या : बाशिंग कुठे आहे ?
सदा : हार कुठे आहे ?
बंड्या : अक्षता कुठे आहेत ?
सदा : अंतरपाट कुठे आहे ?
सुधीर : कसली ? कुठल्या तयारीबद्दल बोलताय तुम्ही ? मी बाबासाहेबांच्या स्वागताची तयारी करतोय. निवडून आल्यावर प्रथमच आपल्या घरी येताहेत. त्यांचा सत्कार करायला नको ?
बंड्या : टोपी कुठे आहे ?
सुधीर : कसली टोपी ?
सदा : ती टोपी– ऐनवेळी तुम्ही फिरवायला शिकलात ती ? अरे, काल तुम्ही दोघांनी इथे बसून सगळं ठरवलंत ? आणि मलाच विचारतोस ? आज काय करायचं ठरलंय ?
सुधीर : हां ! त्याबद्दल ! हे बघा, त्याच्याबद्दल इतक्या मोठ्यानं चर्चा करू नको ! या कानाचं त्या कानाला कळता कामा नये. टॉप सिक्रेट.
सदा : आम्ही त्यात आहोत ना ?
सुधीर : हो !
बंड्या : मग कसलं सिक्रेट ?
सुधीर : हेच ते. या तुमच्या बडबडीमुळं तुम्ही आयत्यावेळी घोटाळा मात्र

करून ठेवणार आहात. बघीन बघीन, नाहीतर सरळ सगळं कॅन्सल करून टाकीन.

बंड्या : नका करू बघा कॅन्सल, तिच्या आयला.

सुधीर : काय ?

बंड्या : तिच्या आईला वाईट वाटेल !

सदा : कॅन्सल कर ! पण हे कॅन्सल म्हंजे बेबी कायमची कॅन्सल ! बघ बुवा, धाडस करण्याची अखेरची संधी. लॉस्ट डे, लॉस्ट डे, लॉस्ट डे.

बंड्या : बंपर ड्रॉ ! बंपर ड्रॉ !

सुधीर : चूप !

बंड्या : भव्य सोडत ! भव्य सोडत !

सुधीर : अरे बाबा, हळू !

बंड्या : नाहीतर बसा आपले भव्य हात चोळत !

सुधीर : हॅं ! आयत्या वेळी तुम्हाला जमलं नाही, तर...

सदा : न जमायला काय झालं ? आम्ही काही तुझ्यासारखे कचखाऊ नाही. एकदा आमच्या ताब्यात देऊन बघा.

सुधीर : पण एवढं सगळं ठरवून आयत्या वेळी ती आली नाही तर ? सगळा प्लॅन फूस होईल.

सदा : आता नो फूस ! आता सरळ घूस !

सुधीर : आणि बाबासाहेब भडकले तर ?

बंड्या : आणखी एक हार घाल. शांत होतील !

सुधीर : हा बघ कसा बोलतो.

सदा : बरोबर आहे ! तुला आता भरवायचं फक्त बाकी आहे. तुमचा चेंगटपणा बघून मलाच बेबीशी लग्न करून मोकळं व्हावंसं वाटायला लागलंय !

बंड्या : तुमचं जमणार नाही !

सदा : का ?

बंड्या : गोत्र जुळत नाही, सूत्र जुळत नाही. शिवाय, तुम्ही म्हातारे आहात !

कावळीण : ती आली ती आली.

सुधीर : बापरे ते आले– मग...

सदा : मग ठरवल्याप्रमाणं करायचं का नाही ?

सुधीर : करायचं.

सदा : गुड ! बेस्ट ऑफ लक !

सुधीर : रेडी ?

सगळे : रेडी !

(दारावरची घंटा वाजते. सुधीर दार उघडतो बाबासाहेब गळ्यात हार घालून खुशीत प्रवेश करतात. त्यांच्याबरोबर हातात हार तुरे घेऊन गुंडुराव आहे.)

सुधीर या ! या साहेब ! अभिनंदन ! अभिनंदन ! या गुंडुराव ! बसा.

बाबासाहेब : थँक्यू ! ही सारी तुमची कृपा ! तुम्ही आम्हाला इलेक्षनमंदी फार मदत केली बघा.

गुंडुराव : बाबासाहेबांनी सगळी रिकार्ड मोडली बघा. आपोझीशनवालं रामराव पार बोंबललं ! हे घ्या पेढे ! अहो काका, ते खिशातलं बी ओझं काढा.

बाबासाहेब : आनि हे तुम्हाला लहानसं बक्षीस. (खिशातून पाकीट काढून देतात.)

सुधीर : पण मला माझा मोबदला आधीच मिळाला आहे.

बाबासाहेब : ते नुसतं पेमेंट. ही खुशी.

सुधीर : थँक्यू. आज मोठा आनंदाचा दिवस— मला वाटलं, तुमच्याबरोबर आई वगैरे येतील.

बाबासाहेब : येतीय ना ती मागनं ! ती येतीय, वगैरे येतीय—म्हणजे बेबी येतीय ! मी तिला म्हटलं आज तू पटवर्धन साहेबास्नी हार घाल !

गुंडुराव . आं ! आन् मग आमचं नंबर मागं पडलं काय ?

बाबासाहेब · त्यो तसला लग्नाचा हार न्हाई ! आता यांनी आपल्याला इतकी मदत केली. यांचा सत्कार करायचा. हारतुरं घालायचं ! बाकी लग्नाची खरी माळ पडणार तुमच्याच गळ्यात.

गुंडुराव : आता कसं सगळं बेस्ट झालं बगा ! हे निवडून आल्याबरोबर हुबळीला तार केलं ! म्हटलं सासरं जिकलं. सून घेऊन येतो— मुहूर्त काढून ठेवा. दवाखान्यात जागा धरून ठेवा !

सुधीर · दवाखान्यात ? का हो ? तुम्हाला बरं नाही का काय ?

गुंडुराव मॅटर्निटीत हो ! डॉक्टर हुप्परगीचं मॅटर्निटी बघा.

सुधीर : मॅटर्निटी एवढ्या लवकर ? फार जबरदस्त प्लॅनिंग दिसतंय तुमचं ?

गुंडुराव अहो, आमच्या हुबळीला रेल्वे स्टेशनवर नसंल, इतकं गर्दी मॅटर्निटी होममध्ये असतं बघा ! सगळ्यांनला तेवढंच काम की हो !

बाबासाहेब पण गुंडुराव, आपल्याला कामं हायेत ! तर पटवर्धनसाहेब, बेबीच्या लग्नाला जरूर यायचं बरं का तुम्ही.

सुधीर वा: ! म्हणजे काय ? मी येणारच. अहो, मी हजर असल्याशिवाय बेबीचं लग्न होईलच कसं ?

बाबासाहेब : हे अगदी बरोबर ! आता माझा शपथविधी झाला, की मुहुर्त धरलाच बघा.

गुंडुराव : (खूष होऊन, सुधीरला) भावलीवाले, माझ्या नि बेबीच्या लग्नात तुम्ही भावल्यांचं बेस्ट खेळ करायला पाहिजेत बघा. पैशाची तुम्ही काळजीच सोडून सोडा हो.

सुधीर . अवश्य. असे भावलीचे खेळ करतो, की तुम्हाला जन्मभर आठवण राहील.

(वायजाबाई आणि बेबी येतात)

सुधीर : या, या. सुस्वागतम्.

बेबी . (हातातला हार दाखवीत) बाबा, याचं काय करायचं ?

बाबासाहेब अगं, पटवर्धन साहेबांच्या गळ्यात घाल. त्येनी आपल्याला केवढी मदत केली.

(बेबी हार घेऊन सुधीरजवळ जाते)

सुधीर : (हार मध्येच अडवून) नको नको. अहो, बाबासाहेबांच्या निवडणुकीत तुम्हीही खूपच मदत केली आहे. मग हारच घालायचा तर आपण दोघांनीही एकमेकांना घालायला हवा. आधी बसा तर. आईसाहेब प्रथमच आमच्या घरी आल्या आहेत. आधी चहापाणी तर होऊ दे.

बायजाबाई . (बाहुल्या पाहत) काय मस्त आहेत हो या भावल्या ! ह्या बोलत्यात का ?

बेबी : हो तर. सगळ्या बाहुल्या बोलतात.

बाबासाहेब : अगं, काम नसतानासुद्धा उगीच बडबड करत्यात तुझ्यावाणी.

बायजाबाई : आता हे बडबडायचं काही कारण होतं का ? (सुधीरला) हां, पटवर्धनसाहेब, आज तुमी आम्हाला काय तरी भावल्यांचा खेळ करून दाखवला पाहिजे.

गुंडुराव · (घड्याळाकडे पाहत) अहो काकी, पण आता ते खेळ बगायचा म्हंजे उशीर होणार की हो फार.

बाबासाहेब . मी काय म्हणतो, की त्या जगतापांकड जेवायला जायला उशीर झाला तर ते तापतील की.

बेबी : काही नाही बिघडत ते तापले तर. पण बाबा, आई एवढं म्हणते तर करू देत की यांना बाहुलीचे थोडे खेळ.

बायजाबाई : जगताप थांबत्याल. त्यान्ला गरज हाय. मंत्रिपदाच्या यादीत तुमचं नाव हाय न्हवं ? आधी मला भावल्यांचा खेळ बगायचा हाय.

मंत्रीणबाई हाय म्हटलं मी आता ! करा हो तुम्ही भावल्यांचा खेळ; पटवर्धन.

सुधीर : करू ना. पण आधी चहा– (सदा विचारेला) विचारे, त्या लक्ष्मणला चहा आणायला सांगा.

(विचारे उठतो. बायजाबाई घाबरून पळू लागतात.)

बायजाबाई : (घाबरून) अवं, हे चालाया लागलं की !

विचारे : नमस्कार ! मी आपलं स्वागत करतो.

बाबासाहेब . पटवर्धन, याला आवरा !

सुधीर . काही करणार नाही. आता दुरुस्त केलंय त्याला.

बाबासाहेब : हे मागच्या टायमाला सगळीकडं धावत सुटलं होतं. ए, घाबरू नकोस. याच्यात आपोआप चालायचं मशिन बसवलंय.

बायजाबाई : काय मस्त भावलं हाय हो.

सदा. : मी आपलं स्वागत करतो ! काय घेणार ? चहा ?

बाबासाहेब : नको बा ! चा लई झालाय.

सदा. : आम्ही फक्त चहाच केलाय.

सुधीर : अरे, असं म्हणायचं नाही. बाबासाहेब, आई, काहीतरी घेतलंच पाहिजे.

बंड्या : पण आपण फक्त चहाच केलाय.

बायजाबाई : बरं, चहाच द्या. पर याला आणू द्या.

बाबासाहेब : मला जास्त नको. अगदी अर्धा अर्धा. (सदा गुंडुसमोर) तुम्हाला ?

गुंडुराव : ते हे आणा. दूद कोल्ड्रिंक.

सदा. : खाली हॉटेलातून घेऊन या. जा, लक्ष्मण, ए लक्ष्मण, (छोटा बाहुला चहा घेऊन येतो.)

बाबासाहेब : अगदी अर्धा अर्धाच.

बायजाबाई : मला बी अर्धाच.

(सदा विचारे एका कपाचे दोन उभे तुकडे करून अर्धा अर्धा कप चहा दोघांना देतो.)

बाबासाहेब : आँ ? खरंच अर्धा कप दिला की ! बेस्ट आयडिया !

विचार : (बेबीला) तुम्ही चहा घेणार ?

बेबी : नाही. सरबत घेईन.

(विचारे बेबीला सरबत देतो.)

बायजाबाई : याच्यात कसलं मशिन बसवलंय म्हनला !

सुधीर : या बाहुल्या बॅटरीवर चालतात. इंपोर्टेड आहेत. (लक्ष्मण जातो.)

बाबासाहेब : आपल्या कॅडीलॅकसारखं इंपोर्टेड.

गुंडुराव : ते इंपोर्टेड यंत्र माणूसला पण बसवता येतं काय ?

बायजाबाई : गुंडुराव, तुम्ही गप बसा. खेळ बघा.

बाबासाहेब : (बायजाबाईंना) अहो, उगीच कशाला सारखं कावता आमच्या खासदारसाहेबांच्यावर ? ते आता जावई होणार तुमचे.

बायजाबाई : चुकलं. त्ये ध्येनातच ऱ्हात न्हाई बघा कधी कधी. (सुधीरला) आता भावलीचा खेळ सुरू करा.

बाबासाहेब : पर लवकर हां !

गुंडुराव : जास्त टाईम नाही.

सुधीर : ठीक आहे. बसा. तर मंडळी, आजपर्यंत तुम्ही बाहुल्यांचे खूप खेळ पाहिले असतील.

बायजाबाई : नायबा !

सुधीर : नाही, तुम्ही नाही. पण प्रचार सभेच्या निमित्तानं यांनी पाहिलेत. पण तुम्ही कुणीही यापूर्वी न पाहिलेला बऱ्याच दिवसांच्या मेहनतीनं तयार केलेला एक अनोखा प्रयोग मी दाखवणार आहे– हायजॅक– हायजॅक हा खेळ परदेशात खूप प्रसिद्ध आहे. हा नुसता बाहुल्यांचा नाही, तर बाहुल्यांनी सादर केलेला जादूचा प्रयोग आहे. हायजॅक हायजॅक !

बायजाबाई : मंजी काय वो ?

बाबासाहेब . एवढं सादं म्हाईत नाही ? काय वो सुधीरराव–

सुधीर : हायजॅक म्हणजे अपहरण.

बाबासाहेब : हां ! अपहरण.

बायजाबाई : म्हंजी काय ?

बाबासाहेब : त्यो एक हरणाचा प्रकार हाय वस्त्रहरनसारखा.

सुधीर : तुम्ही पेपरमध्ये वाचलं असेल. आजकाल विमानं पळवली जातात– बसेस– गाड्या.

बाबासाहेब : अवो, निवडून आलेले आमदार पळवतात तर !

सुधीर . आणि बदल्यात खूप मोठी मागणी केली जाते. पैसा किंवा तसंच काही तरी. तर आपल्या प्रयोगात बांधून ठेवलेल्या माणसाची सुटका त्यांना हात न लावता गाणं म्हणत बाहुल्या करणार आहेत.

बायजाबाई : म्हंजी जादूनं ?

सुधीर तीच तर खरी गंमत आहे. मी काय करणार– तुम्हा तिघांना या खुर्च्यांना दोरीनं बांधणार आणि मग जादूनं या दोऱ्या आपोआप सुटतील.

बाबासाहेब . खरं का काय ? नक्की ना ? माजा उद्या शपथविधी आहे म्हनून म्हटलं.

गुंडुराव : मला हे वट्ट डेंजर वाटतं बघा.

सुधीर : बघाच ! मी अगदी हातसुद्धा न लावता दोऱ्या आपोआप सुटतील. तुमच्या शुभविवाहासाठी खास हा प्रयोग तयार केला आहे. एकेक मंगलाष्टकं सुरू झाली की दोऱ्या आपोआप सैल होतील आणि शेवटच्या ' शुभमंगल सावधान 'ला तुम्ही सगळे मोकळे !.

बंड्या : मग हरकत नाही. फार फार मजा येईल की रे ! हुबळीच्या सगळ्या बड्या बड्या लोकांना असं बांधून ठेवतो. मोठं प्रेझेंट दिल्याशिवाय सुटकाच नाही.

सुधीर · बरोबर. बसा. (बांधतो)

बाबासाहेब . हे खुर्चीला बांधायची आयडिया एकदम बेस्ट. प्रत्येक मंत्र्याला बांधून ठिवलं पायजे. म्हंजे त्यांची खुर्ची जाणार नाही. (सुधीर त्यांना बांधतो.)

बायजाबाई . मलापर बांदा. किती वर्षांनी यांच्यासंगट बसायला मिळतंया.

गुंडुराव : हे बेबीला पण बांधकी आमच्या शेजारी.

सुधीर . (बेबीला) तुम्ही थांबा माझ्या मदतीला.

गुंडुराव · मदत मग आमी करतो की. यवडं इलेक्शनला मदत केलं तर हे मदत काय अवघड हाय काय ?

बायजाबाई : गुंडुराव, जरा गप बसा की. काय तोंड हाय का गिरनीचा भोंगा !

बाबासाहेब . अग ए, आपले जावाय होनार हायेत. त्यांना असं बोलतीस !

बायजाबाई . हे ध्येनातच ऱ्हात ऱ्हाई बगा !

सुधीर : ओके. रेडी. स्टार्ट.

विचारे . चला. तयारी सुरू करा. तयारी करा.

बंड्या : दोन हार आणा.

सुधीर . (हार आणतो.) आणले.

विचारे · दोन पाट आणा.

सुधीर : (पाट आणतो.) आणले.

विचारे एक अंतरपाट आणा. छोटा बाहुला– दोन मुंडावळ्या–

(सुधीर अंतरपाट आणि मुंडावळ्या आणतो.)

विचारे मुंडावळ्या इकडे करा. बेबीताई, हे घ्या. (बेबीच्या हाती मुंडावळ्या देतो.)

गुंडुराव च्यामारी. काय लगीन करता काय हो, भावलीवाले ?

विचारे · तोंड बंद करा. नाहीतर जादू चुकेल. या मुंडावळ्या बेबीला नाही, आमच्या ठकीला बांधायच्या आहेत.

बंड्या : मला मुंडावळ्या बांधा. मला मुंडावळ्या बांधा.

बाबासाहेब : अहो, ठकीचं लगीन करताएत.

सुधीर : (बंड्याला) हो हो, बांधायच्या.

(बेबी ठकीला घेऊन येते.)

ठकी मी नाही बंड्याशी लग्न करणार.

बंड्या : भर मांडवात नवरदेवाचा अपमान ? कानफटात मारीन.

विचारे अरे असे भांडू नका. ही बघा मंडळी यायला लागली.

ठकी बघा मला मारतो. मी नाही याच्याशी लग्न करणार.

सुधीर . मग कोणाशी करणार ? या सदाशी ?

ठकी अहं. म्हातारा आहे.

सुधीर . या पानशांशी ?

ठकी : अहं, रागीट आहे.

सुधीर : मग या गाढवाशी ?

ठकी : गाढवासारखं विचारू नका.

सुधीर : मग कुणाशी लग्न करणार?

ठकी : मी ना, मी ना, मी तुमच्याशी लग्न करणार !

सुधीर : माझ्याशी ?

(सगळे हसू लागतात.)

गुंडुराव : लावा की हो सुधीरराव लग्न हिच्याबरोबर, हे वायको तुमाला एकदम शोभून दिसतंय बघा !

विचारे मध्ये बोलू नका. जादू चुकेल !

(बेबी बंड्याच्या मुंडावळ्या काढून सुधीरला लावते.)

सुधीर अगं पण–

विचारे चला, लवकर उभे रहा. मुहूर्त चुकेल. ठकीला इथे बसवा. (सगळ्यांना अक्षता वाटतो)

बाबासाहेब . हे काय ?

विचारे अक्षता ! (गुंडूला अक्षता देऊन) या अक्षता कुठे उडवायच्या ते तुम्हाला माहीत आहे ना ?

गुंडुराव (रागानं) एऽऽ.

विचारे शांत रहा. अरे यांना आयस्क्रीम द्या ! (बंड्याच्या हातात कलश देतो.)

बंड्या (आनंदाने) मी करवला. मी करवला.

विचारे . (बेबीच्या हातात अंतरपाटाआड हार देऊन) चला, लवकर उभे रहा.

(अंतरपाटाच्या ज्या बाजूला बाबासाहेब वगैरे बसले आहेत, त्या बाजूला सुधीर, त्याच्या मागे करवला बंड्या आहेत. अंतरपाटाच्या दुसऱ्या बाजूला ठकी आणि तिच्या मागे करवली म्हणून बेबी उभी आहे.)

बाबासाहेब : काय येंड हाईत. अवो आंतरपाट धरायला दुसरा भटजी पाहिजे की.

विचारे काही जरूर नाही. तर आता मी मंगलाष्टकं म्हणायला सुरुवात करतो ! एकेक मंगलाष्टकाला तुमच्या दोऱ्या आपोआप सुटतील— कुणीही मध्ये बोलायचं नाही. नाहीतर जादू फसेल— शुभ मंगल सावधान— (सगळे अक्षता टाकतात) गंगा सिंधू सरस्वती च यमुना गोदावरी नर्मदा—

(ठकीला बाजूला ठेवून वधूच्या जागी बेबीच हातात हार घेऊन उभी राहते.)

विचारे . (मंगलाष्टके म्हणतो.)

गुंडुराव . (धडपडत) अहो, हे दोरी सुटत नाही हो.

विचारे उताविळ होऊ नको ! जादूचा परिणाम दिसायला थोडा वेळ लागतो. (पुढची ओळ म्हणतो.)

गुंडुराव काका, हे सुटत नाही की हो. या भावलीवाल्यानं डाव टाकला आपल्यावर !

बाबासाहेब : अहो पटवर्धनसाहेब, या दोऱ्या सुटत नाहीत की हो.

विचारे : हे गुंडुराव मध्ये बोलले ना, जादू चुकली !

बायजाबाई : आता गप्प बसा ! चांगल्या शुभकार्यात वरडता कशापाय ?

विचारे : (मंगलाष्टकं म्हणतो) रामौ राजमणी सदा विजयते......

बाबासाहेब अगं, ते आपले...

बायजाबाई : हाय, ते ध्येनात हाय.

गुंडुराव : ते पलीकडे बेबी उभं दिसतंय. (मुंडावळ्या लावून ओरडू लागतो.)

विचारे . चला, घाई करा. मुहूर्त चुकतोय.
तदेव लग्नम् सुदिनं तदेव तारा बल चंद्रबलंच तदेव विद्या बलं दैव बलं तदेव, वाजवा रे वाजवा.

(वाद्यांचा आवाज, गुंड्या ओरडून गोंधळ घालतानाच— दोघे एक मेकांच्या गळ्यात हार घालतात. विचारे त्यांना आईकडे घेऊन येतो. सुधीर व बेबी पाया पडतात.)

बाबासाहेब : काय, तुमचं लगीनपर लागलं ?

गुंडुराव : (रडत) काका, घात झाला ! बोल बोल म्हणता फसविलं. आमाला बांदून घालून यानं माझ्या बायकोबरोबर लगीन लावलं की हो !

बाबासाहेब : हो चारसोबीसगिरी हाये, फसवणूक आहे. मी खटला करीन तुमच्यावर!

बायजाबाई : गपा ! औक्षवंत हो पोरी. (तिला सोडतात) माज्या आशीर्वादानं झालंय समदं.

बाबासाहेब : मंजे बंडखोरी घरातलीच हाय ?

बायजाबाई . उगाच भरल्या लगीनघरात जावयाला कशापाई शिव्या देता हो– अवो त्येचा पायगुण चांगला म्हणून– सतरा वेळा पडणारे तुम्ही या वेळेला निवडून आला !

गुंडुराव : मंजे आमी गाढवासारखे राबलो ते उगाच काय ?

बायजाबाई : म्या गाढवाशी बोलत नाही.

गुंडुराव : पर मी बोलतो ना !

बायजाबाई : हे बघ मी तुला आदीच सांगितलंय. आन तुमाला बी. या गुंड्या-सारख्या ऐतखाऊ मानसापरीस माजा जावय लई गुणाचा हाय. तुमाला जगाचं राजकारन कळंत असंल पण ते राजकारन माज्या घरात न्हाय चालायचं.

गुंडुराव : ते तुमचं तुमी बगा. बेबीचं माज्याशी लगीन लावायचं बाबासाहेबनी मला कबूल केलंय. तुमी जरा तोंड सोडून बोला की हो घडघड, बाबा-साहेब ! मगापासून मी यकटाच बोलतोय.

बाबासाहेब त्येचं काय हाय गुंडुराव, हे झालंय ते बरुबर न्हाय हे कबूल. पर घरातल्या मानसाविरुद्ध आपन तरी, किती जानार ?

गुंडुराव : मंजे आता तुमी पण टोपी फिरवली की बोल बोल म्हनता ! ते फार जड जांईल तुमाला ! बाला सागून तुमचं निवडणूक रद्द करतो मी !

बाबासाहेब · ए, मला दम द्यायचा न्हायी. आता निवडून आलोय. तुझ्या बाची भीती घालू नको. टोपी फिरवायची कला मी त्येच्याकडनंच शिकलेला हाय ! (गुंडुरावला सोडतात.)

गुंडुराव : मंजे हे लग्न तुमाला मान्य आहे म्हना की !

बाबासाहेब : तो आमची घरची बाब हाये ! आमच्या अंतर्गत प्रश्नात बाहेरच्यांची ढवळाढवळ नाय पाहिजे. खासदार, आता गुमान घराला जावा. तुमचं बेळगावी लोनी इतळवायला वेळ लागनार न्हाई मला !

गुंडुराव . आमचं बापचं पावर म्हाईत आहे तुमाला ! ते बेळगाव आता या जन्मात मिळत नाही तुम्हाला !

बाबासाहेब : अरे जा ! बेळगाव महाराष्ट्रात आला न्हाई तर अख्खा महाराष्ट्र बेळगावमंदी जाईल. आनी त्याला आपल्यात सामावून घेईल. तुज्या-सारखी मानस न्हाईत तिथं. माज्या कारभारणीच्या आशीर्वादानं हे झालंय. तेव्हा तिच्या पाठीशी उभं रहाणं हे माझं नवरा म्हणून कर्तव्य आहे. आन शेवटी लक्षात ठेवा, आपल्या देशाचं कल्चर कोणतं? ॲग्रीकल्चर. सगळ्यांना ॲग्री करायचं ! सगळ्यांना कबूल करायचं. म्हंजे आपल्याला काही करावं लागत न्हाई !

गुंडुराव : ते बगा, हे तोंड मी असं घेऊन जातंय ! एक दिवस तुमचं पण असंच होणार बघा ! बेबी, जातंय ! (अश्रू ढाळून जातो.)

बायजाबाई हे बेस केलं बगा. उगा बापाच्या जिवावर तुमाला भावलीवानी नाचवत होता. पण या भावल्यांनी तुमाला मानसात आनून सोडलं.

बाबासाहेब . पर हे लगीन काही खरं नाही. अगं माज्या पोरीचं लगीन कसं थाटात व्हायला पाहिजे. बडे बडे मंत्री यायला पायजेत. पंगतीवर पंगती उठल्या पायजेत. असा बार उडाला पायजे.

विचारे तो उडणारच. पण तुमचा आशीर्वाद पायजे !

सुधीर : बाबासाहेब ! तुमचा आशीर्वाद पाहिजे (त्यांच्या पाया पडतात.)

बेबी : आशीर्वाद.

बाबासाहेब : मिळेल. पण समदं शिस्तीप्रमानं झालं पायजे. पक्षाची शिस्त कदी मोडायची नसते. बाकी काय पण मोडलं तरी चालतंय. चल बेबी ! इथे उभी रहा !

बाबासाहेब (बायजाला) ए आपन बी थोडं भावल्यावानी वागू या !

बायजा : काय कायतरी.

बाबासाहेब · अगं गंमत ! (बेबीला) तुमाला काय पायजे ?

बायजा . जावयबापू, तुमी इते !

बाबासाहेब ·विचारे गुरुजी !

विचारे : हजर !

बाबासाहेब . पडदा धरा.

विचारे : अंतरपाट.

बाबासाहेब · तेच ते.

विचारे (मंगलाष्टकं म्हणतो)– तदेव लग्नं सुदिनं तदेव.
ताराबलं चंद्रबलं तदेव.

(बाहुल्या सनया-चौघडा वाजवतात)

(पडदा)

IRBK-0120242

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २०२४२ ता. दि. ८।३।८४